क्षमा मागणं हा एक सद्‌विचार आहे तर क्षमा करणं हा सद्‌आचार. आमच्याकडून कळत-नकळत आपलं मन दुखावलं गेलं असेल तर आपणाकडे क्षमायाचना करत आहोत.
* क्षमाप्रार्थी *
डॉ. कुंदनमल । संदीप
लोढा परिवार
केवल अगरबत्ती
अहमदनगर.

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २७.०८.२०२५ | अंक नं. १२६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

उत्सव मजुरीचा
किमान 20% किंवा जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना.. तेवढी टक्के मजुरीत सूट..
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
दागिन्यांचे वजन 1 ग्रॅम ते 20 ग्रॅम पर्यंत मजुरीत मिळणारी सूट 20%
दागिन्यांचे वजन 50 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 50%
दागिन्यांचे वजन 100 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 100%
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

SHRI VARDHAMAN PLYWOOD CENTER
One stop solution for your interior needs
आत्मशुद्धि के पावन महा पर्युषण के पुनीत अवसर पर गत वर्ष में हुए ज्ञात - अज्ञात, अविनय, राग-द्वेष, मनोमालिन्य के लिए
मिच्छामि दुक्कडम
क्षमाप्रार्थी
शैलेश सुरेश मुनोत
रोनक । राज । रितिक
रचित । रिधान व मुनोत परिवार
श्री वर्धमान प्लायवुड सेंटर
मुनोत इस्टेट, स्टेशन रोड, अहिल्यानगर. मोबा.: ८८६३०५०५०५

आम्ही आपले कोमल हृदय कधी दुखावले असल्यास, आम्ही आपली मनापासुन क्षमा मागतो.
मिच्छामी दुक्कडम्
क्षमाप्रार्थी
कुबेर मार्केट
तेलीखुंट, एम.जी.रोड, अहिल्यानगर.
मो. 7972274799

नागेबाबा मल्टिस्टेट
श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि., अ.नगर
गत वर्ष मे अगर हमसें कोई भुल हुई हो, तो उसके लिए हम क्षमाप्रार्थी है...
क्षमापना
विश्वविक्रम रचणारी अग्रगण्य संस्था! । भार नव्हे; आधार देणारी संस्था!
कॉर्पोरेट ऑफिस : नागेबाबा हाऊस, माऊली सभागृहासमोर, सावेडी, अ. नगर.
955 255 4010

कंदी पेढा मोदक
मलाई पेढा मोदक
बुंदीलाडू मोदक
खोबरा-ड्रिंक मोदक
काजू मोदक
मलाई मोदक
बुंदीलाडू मोदक
रवा लाडू मोदक
केशर मोदक
खास गणेश चतुर्थीनिमित्त मोदक
स्पेशल
बन्सी महाराज मिठाईवाले
रामचंद्र खुंट, अहमदनगर.
Mo. 9860939981, 9881761101

क्षमापना
मन और मकान को..!!
वक्त - वक्त पर साफ करना बहुत जरूरी है।
क्योंकि मकान में बेमतलब सामान..और मन में बेमतलब गलत फहमियां भर जाती हैं..
क्षमापना के महापर्व पर्युषण की आराधना करने से पूर्व आप सबको अंतःकरण पूर्वक...
गलती करना मानवीय है । क्षमा करना दैविक ।
क्षमाप्रार्थी -
श्रीमती प्रकाशबाई माणकचंदजी चोरडिया
महावीर — सौ. विमला
गौतम — सौ. स्वाती
राजकुमार — सौ. अमृता
चि. अरिहंत, आकांक्षा, ध्रुवी, दिव्यम
एवम् चोरडिया (कोठारी) परिवार
सुखशांती इलेक्ट्रिकल्स् | गौतम मशिनरी
२२, किसानक्रांती बिल्डींग, मार्केटयार्ड, अ.नगर
मो. 9850977174 / 9422226409 / 7768064109

क्षमा कीजीए सरल हृदयसे
क्योंकी क्षमा विरोंका भूषण हैं
मन, वचन, कर्म सें करबध्द
॥ मिच्छामी दुक्कडम् ॥
विविध क्षेत्रात काय करीत असतांना कळत-नकळत झालेल्या चुकांबद्दल आम्ही आपली उदार अंतःकरणाने क्षमायाचना करीत आहोत.
सुधीर चोपडा * निलेश चोपडा
एवम् चोपडा परिवार
Saideep
साईदीप ग्रुप
अहमदनगर - पुणे



इम्पोर्टेड टेबल टॉप वॉश बेसीन उपलब्ध..
10% to 50% Discount
एकदा अवश्य भेट द्या.
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
9145008009 / 9822542011

भूल हो जाना मानवीय स्वभाव है
लेकिन क्षमा करना दैवीय स्वभाव है ।
क्षमापना
संवत्सरी पर्युषण के पावन पर्वपर जाने अनजाने हुए गलतीयोंके लिए हार्दिक क्षमायाचना !
गणेश उत्सव की सभीको हार्दिक शुभकामना !
• क्षमाप्रार्थी •
मुथा परिवार (ताहराबादवाला)
आधुनिक कुरियर
अहमदनगर - पुणे

समस्त पुण्यशाली तपस्वियों की साता पूछते हैं।
तपस्या की बारम्बार अनुमोदना करते हुए आपकी उज्वल भविष्य की मंगल कामना करते हैं।
जैनम जयति शासनम
मिच्छामी दुक्कडम
"क्षमा"
* क्षमाप्रार्थी *
SINCE 1920
बन्सी भाई पान शॉप
अक्षता मंगलकार्यालय समोर, कुंदन मार्केट शेजारी, स्टेशन रोड, अहिल्यानगर मो. ९२६०६०६०२५/९१४५४५४५०४/९५११२१५०५७

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# नगर-पुणे महामार्गावर अल्पवयीन मुलांसह दोन टोळ्या करत होत्या रात्रीच्यावेळी लुटमार

## बोल्हेगावच्या ७ लुटारूंना पोलिसांनी केले जेरबंद, ३ गुन्हे आले उघडकीस, ४ फरार आरोपींचा शोध सुरु

नगर - नगर - पुणे महामार्गावर रात्रीच्या वेळी वाहनचालकांना अडवून कोयता व सुऱ्याचा धाक दाखवुन लुटमार करणाऱ्या २ टोळ्या पोलिसांनी उघडकीस आणल्या आहेत. या टोळ्यांमधील ७ जणांना जेरबंद करण्यात आले असून यात ३ अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. तर अजूनही ४ आरोपी फरार आहेत. हे सर्व आरोपी नगर एमआयडीसी जवळील बोल्हेगाव परिसरात राहणारे आहेत. त्यांच्या कडून ३ जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



नगर - पुणे महामार्गावर रात्रीच्या वेळी लुटमार करणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर पुणे महामार्गावर नगर तालुका व सुपा पोलिस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी वाहनचालकांना लुटण्याच्या घटना वाढल्या होत्या. या आरोपींना पकडण्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांनी पोलिस अंमलदार विष्णु भागवत, गणेश लोंढे, भिमराज खर्से, रिचर्ड गायकवाड, बाळु खेडकर, भाऊसाहेब काळे, मनोज साखरे, फुरकान शेख, प्रशांत राठोड व चालक अरुण मोरे तसेच सुपा पोलीस स्टेशनच्या पो. नि.ज्योती गडकरी यांनी उपनिरीक्षक मंगेश नागरगोजे, पोलीस अंमलदार मेघराज कोल्हे, योगेश सातपुते यांचे पथक नेमले होते.

सदर पथक आरोपींचा शोध घेत असताना पो.नि. कबाडी यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदर चा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी यश भाऊसाहेब शिरसाठ (रा.गांधीनगर, बोल्हेगाव) याने त्याच्या साथीदारांसह केला असुन, तो सध्या गांधीनगर बोल्हेगाव येथे त्याचे साथीदारांसह बसलेला आहे. ही माहिती मिळताच त्यांनी तपास पथकाला तात्काळ कारवाई साठी पाठविले. या पथकाने सदर ठिकाणी जावून यश भाऊसाहेब शिरसाठ (वय २०, रा. गांधीनगर, बोल्हेगाव), अथर्व रमेश सुर्यवंशी (वय १९, रा.नवनाथनगर, बोल्हेगाव), साहील अतिफ शेख (वय २१, रा.बोल्हेगाव), विशाल बाबासाहेब पाटोळे (वय २०, रा. गांधीनगर, बोल्हेगाव) यांच्यासह याच परिसरातील १७ वर्ष वयाची ३ मुले अशा ७ जणांना पकडले.

आरोपी यश भाऊसाहेब शिरसाठ याचे कडे कसून चौकशी केल्यावर त्याने या साथीदारांसह फरार असलेले अदित्य लुकास भोसले (रा. गांधीनगर, बोल्हेगाव), चेतन संतोष सरोदे (रा. गांधीनगर, बोल्हेगाव), नयन दादु पाटोळे (रा. गांधीनगर, बोल्हेगाव), प्रेम राजु नायर (रा. गांधीनगर, बोल्हेगाव) यांच्या सोबत २२ ऑगस्ट रोजी पहाटे २ आणि २५ ऑगस्ट रोजी पहाटे १ असे ३ लुटमारीचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. ताब्यातील आरोपींना सुपा पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असून गुन्हयांचा पुढील तपास सुपा पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, नगर ग्रामीण चे पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या व सुपा पोलिसांच्या पथकाने केली आहे.

### ३ दिवसांत केलेले 'हे' ३ गुन्हे आले उघडकीस

या २ टोळ्यांनी २२ ऑगस्ट रोजी पहाटे १ वाजता सुपा गावात शिवरत्न मोटर्स समोर मुरलीधर विठ्ठल गिरी (रा.परळी वैजिनाथ, जि. बीड) या ट्रक चालकाला अडवून लोखंडी सत्तूरचा धाक दाखवत त्याच्या कडील पैसे, मोबाईल व सोन्याचा बदाम असा ३४ हजार १७० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला होता. त्यानंतर पहाटे २ वाजता पवारवाडी घाटात लघुशंकेसाठी रस्त्याच्या कडेला थांबलेल्या शिवराज वशिष्ट काळे (वय २०, रा. घाटसावळी, जि.बीड) याची हिरो स्प्लेंडर मोटार सायकल व तिला अडकवलेली पिशवी पळवून नेली होती. त्यानंतर २५ ऑगस्ट रोजी पहाटे २ च्या सुमारास सुपा टोलनाक्या जवळील म्हसने फाटा येथे रोडचे कडेला उभा असलेल्या ट्रक मधील चालक प्रदीप बिभीषण तिडके (वय ३२, रा.संगम ता. धारूर, जि.बीड, हल्ली रा. चाकण, पुणे) यास कोयता व सुऱ्याचा धाक दाखवुन त्याचे ताब्यातील मोबाईल फोन, रोख रक्कम असा ५७ हजार ८०० रुपयांचा ऐवज लुटला होता. या तिन्ही गुन्ह्यांची कबुली पकडलेल्या आरोपींनी दिली आहे.

## बलात्कार प्रकरणी शिवसेनेचे किरण काळे यांना जामीन मंजूर

नगर - २१ वर्षीय विवाहित महिलेच्या बलात्काराच्या गुन्ह्यातून ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख किरण काळे यांना जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. २२ जुलै रोजी रात्री कोतवाली पोलीस स्टेशन येथे काळे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर मध्यरात्री त्यांना राहत्या घरातून पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

काळे यांच्या वतीने ॲड. राहुल पवार यांनी युक्तिवाद केला. सरकारी पक्षाची देखील बाजू मांडली गेली. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाने जामीन मंजूर केला. अटक झाल्यावर तीन दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर काळे यांची २५ जुलै रोजी नाशिक सेंट्रल जेल येथे न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती. ही घटना सुमारे दोन ते तीन वर्षांपूर्वी घडल्याचे फिर्यादीने म्हटले होते. नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून काळे यांना त्यांचा सोशल मीडियातून फोन नंबर मिळवत मदतीसाठी संपर्क साधला. त्यानंतर काळे यांनी पीडितेला आपल्या चितळे रोडवरील संपर्क कार्यालयात बोलवत वारंवार अत्याचार केल्याचे म्हणणे फिर्यादीने नोंदविले होते.

ॲड. पवार यांनी युक्तीवाद केला. ते म्हणाले, पिडीतेने आरोप केल्याप्रमाणे बलात्काराचा प्रसंगच घडलेला नाही. काळे हे राजकीय नेते आहेत. एका पक्षाचे शहरप्रमुख आहेत. त्यांनी कोट्यवधी रुपयांचा घोटाळा व्यापक जनहितार्थ बाहेर काढला. म्हणून त्यांना षडयंत्र करून यात गोवले गेले आहे. यापूर्वी देखील आयटी पार्क स्कॅम काळे यांनी उघड केला. त्यावेळी देखील त्यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस तपासा अंती गुन्हा घडलाच नसल्याचे निष्पन्न झाले होते.

# सावेडी उपनगरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी

### नागरिकांमध्ये पसरली कुत्र्यांची भीती, महापालिका प्रशासनाला वाटेना गांभीर्य

नगर - नगर शहारातील सावेडी उपनगरात वार्ड क्र.२ मधील लक्ष्मी नगर येथे भटक्या कुत्र्यांच्या टोळीने अचानक एका महिलेवर हल्ला केला. या घटनेत महिला गंभीर जखमी झाली असून भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः महिलेच्या अंगाचे लचके तोडले आहेत. त्यामुळे नगरमध्ये पुन्हा एकदा भटक्या कुत्र्यांची दहशत पाहायला मिळाली असून नागरिक भयभीत झाले आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, उमा विजय कासारे (वय ३९, रा.लक्ष्मीनगर) या सकाळी ६ च्या सुमारास फिरायला जात असतांना काही भटक्या कुत्र्यांनी मागून येत त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्या महिला गंभीर जखमी झाल्या. कुत्र्यांपासून स्वतःला वाचवण्यासाठी त्यांनी आरडा ओरडा केला, मात्र कुत्रे तिथून हलायला तयार नव्हते. ते त्यांच्या अंगावर जाण्याचा प्रयत्न करीत होते. आरडाओरडा केल्यानंतर काही वेळाने लोक



उमा कुसारे (जखमी)

घराबाहेर पडले. त्यानंतर त्या कासारे यांना कुत्र्यांपासून वाचवण्यात आले. त्यानंतर त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक व भाजपचे शहर सरचिटणीस निखिल वारे यांनी रुग्णालयात धाव घेत त्यांची विचारपूस केली. कुत्र्यांनी कासारे यांच्या हातांना पायांना मोठ्या प्रमाणात चावा घेतल्याने त्यांना मोठ्या जखमा झालेल्या आहेत. त्यामुळे प्लास्टिक सर्जरी करण्याची गरज भासणार असल्याने वारे यांनी माजी खा. सुजय विखे पाटील यांना फोनवर घटनेची माहिती दिली. त्यांनी लगेच जखमी कासारे यांना विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हॉस्पिटल मध्ये हलविण्यास सांगितले. त्यामुळे त्यांना विळद घाटात हलविण्यात आले असून त्यांच्यावर तेथे मोफत उपचार सुरु करण्यात आल्याचे निखील वारे यांनी सांगितले.

### 'आंदोलन' करण्याचा इशारा देताच मनपाकडून कुत्रे पकडण्यास सुरुवात

या घटनेनंतर वारे यांनी आ.संग्राम जगताप यांना माहिती दिली. त्यांनी आयुक्तांना फोन करून जखमी महिलेस नुकसान भरपाई देण्याच्या सूचना दिल्या. तसेच वारे यांनी ही आयुक्त यशवंत डांगे व आरोग्य अधिकारी डॉ.सतीश राजूरकर यांना फोन करून महानगरपालिकेने तातडीने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा महापालिकेच्या आवारात भटकी कुत्री आणून सोडले जातील, असा इशारा दिला. त्यानंतर आयुक्तांनी व डॉ. राजूरकर यांनी कुत्रे पकडणाऱ्या संस्थेला कळवून या भागात भटके कुत्रे पकडण्याची मोहीम सुरु केली आहे. ही मोहीम एका दिवसापुरती न राबवता कायम सुरु ठेवावी अन्यथा या प्रश्नी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा निखील वारे यांनी दिला आहे.

## पाईपलाईन रोड येथून दुचाकीची चोरी

नगर - पाईपलाईन रोड वरील यशोदा नगर येथील तागड वस्ती येथे घरासमोर लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एम एच १७ डी जी ५००६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २४ ऑगस्ट रोजी रात्री घडली.

याबाबत मयूर बाळासाहेब ठाकरे (वय २३, रा. सोनगाव ता. राहुरी, हल्ली रा. तारकपूर) याने तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## तू खाली ये तुझी आज विकेटच टाकतो अशी धमकी देत नगरमध्ये एस.टी. बस चालकाला प्रवाशाकडून मारहाण

नगर - शहरातील स्वस्तिक बसस्थानक येथे एका एस. टी. बस चालकाला प्रवाशाने शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चालक अंबादास अजिनाथ राख (वय ३४, रा. हाजीपुर, ता. आष्टी, जि. बीड) यांच्या फिर्यादी वरून मंगेश भरत खाकाळ (रा. आंबिलवाडी, ता. नगर) व त्याच्या साथीदाराविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अंबादास राख हे एस.टी. महामंडळात गेल्या १० वर्षांपासून चालक म्हणून कार्यरत आहेत. २५ ऑगस्टला ते एस.टी. (क्र एमएच १४ एच ०८५५) या बसवर राजगुरूनगर ते पैठण या मार्गावर ड्युटीवर होते. या बसवर अंकुश जनार्धनराव शेंडगे (वाहक) देखील ड्युटीवर होते. संध्याकाळी पैठणहून परतीच्या प्रवासात बस स्वस्तिक बसस्थानक येथे आल्यानंतर दोन प्रवाशांनी बसमध्ये जागा आहे का, अशी चौकशी केली. जागा नसल्याचे सांगितल्यावर ते प्रवासी खाली उतरले. याच दरम्यान त्यांचा मित्र मंगेश खाकाळ बसमध्ये चढला व चालकाला शिवीगाळ करू लागला.

चालक राख यांनी त्याला समजावून सांगितले असता तु बसमधून खाली उतर, मग पाहतो असे म्हणत त्याला बाहेर बोलावले. चालकाने नाव विचारल्यावर मी मंगेश भरत खाकाळ, मला कोणाचा धाक नाही, तुझी आज विकेट टाकतो असे म्हणत धमकी दिली. त्यानंतर त्याने शिवीगाळ करत मारहाण केली. या मारहाणीमध्ये चालकाच्या शर्टचे बटण तुटले. वाहक शेंडगे यांनी हस्तक्षेप केला असता त्यांनाही शिवीगाळ करण्यात आली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या प्रकारामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण झाला असून आरोपी मंगेश खाकाळ विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हद्दपार आदेशाचा भंग करणाऱ्याला पकडले

नगर - हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून परवानगीशिवाय नगर हद्दीत प्रवेश केल्याप्रकरणी एकाविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई २५ ऑगस्ट रोजी दुपारी करण्यात आली. ऋषीकेश ऊर्फ बबलु संभाजी भगत (वय २६, रा. कापुरवाडी, ता. नगर) असे हद्दपार आदेशाचे उल्लघंन केलेल्या आरोपीचे नाव आहे.


ऋषीकेश हा हद्दपार असतानाही नगर हद्दीत आला असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने २५ ऑगस्ट रोजी दुपारी कापुरवाडी परिसरात तपास केला असता, ऋषिकेश भगत हद्दपार असून देखील विनापरवाना जिल्ह्यात प्रवेश केल्याचे उघड झाले. त्याला उपविभागीय दंडाधिकारी नगर विभाग यांच्या आदेशाने ६ जून २०२५ पासून सहा महिन्यांसाठी नगर जिल्ह्यातून हद्दपार केले होते. मात्र सदर आदेशाचा भंग करून तो पुन्हा जिल्ह्यात परतला. त्याच्यावर अंमलदार योगेश कर्डिले यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मंगलबाई बेरड यांचे दुख:द निधन



नगर - नगर तालुक्यातील दरेवाडी येथील मंगलबाई रामदास बेरड (वय ५४) यांचे २७ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. दरेवाडी येथील स्मशानभूमी येथे स्वर्गीय मंगल बेरड यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अविनाश बेरड यांच्या त्या मातोश्री होत.

## हाजी शब्बीर बागवान (नारियलवाले) यांचे निधन



नगर - रामचंद्रखुंट येथील रहिवासी हाजी शब्बीर अब्दुल करीम बागवान (नारियल वाले) (वय ७८) यांचे २२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सहा भाऊ एक बहीण, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गंज बाजारात नारियल वाले यांचे दुकान आहे.

## नितीन जोशी यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - बेलापूर खुर्द येथील रहिवाशी शेतकरी नितीन ज्ञानेश्वर जोशी (वय ४७) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात वडील, भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. सेवानिवृत्त तहसीलदार ज्ञानेश्वर कुंडलिक जोशी यांचे द्वितीय चिरंजीव, सुहास जोशी यांचे बंधू, चि.अथर्व व तेजस जोशी यांचे वडील होत.

## यादव लोखंडे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - कानिफनाथ मंदिर रोड, मोरगेवस्ती, वार्ड नं.७ येथील रहिवासी सेवानिवृत्त कृषी अधिकारी यादव भिमाजी लोखंडे (वय ६९) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बेलापूर येथील शेतकरी प्रसाद (बापू) लोखंडे व योगेश लोखंडे यांचे वडील, साहित्यिक स्व.नामदेवराव देसाई यांचे ते मेहुणे होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## केडगावमध्ये दोघांकडून चाकू घेवून घरात घुसत चोरीचा प्रयत्न

नगर - दोघांनी हातात चाकू घेवून घरात घुसत चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची घटना केडगाव उपनगरात लिंक रोड वर कार्मेल शाळेजवळ घडली. मात्र मुलीने आरडाओरडा केल्याने चोरट्यांनी तिच्या नाकाला गुंगीचे औषध लावलेला रुमाल लावून तिला बेशुद्ध करून पलायन केले.

याबाबत किशोर त्रिंबक कातोरे (वय ४२, रा. कार्मेल शाळेजवळ, लिंक रोड केडगाव) यांनी २६ ऑगस्ट ला रात्री उशिरा कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना २२ ऑगस्ट रोजी घडली आहे. त्या दिवशी सायंकाळी ५ च्या सुमारास त्यांची मुलगी एकटीच घरी असताना २ अज्ञात चोरटे घरात घुसले, ते उचकापाचक करू लागले. याची चाहूल लागताच मुलीने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. त्या चोरट्यांनी मुलीला पकडून तिच्या गळ्याला चाकू लावला. आरडाओरडा केला तर जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर तिच्या नाकाला रुमाल लावला. त्यामुळे ती बेशुद्ध पडली. त्यानंतर चोरट्यांनी तेथून पळ काढला असल्याचे कातोरे यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात दोन चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०९ (६) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## केडगावमधील सराफी दुकान फोडून सोन्या चांदीचे दागिने चोरट्यांनी पळविले

नगर - केडगाव उपनगरातील शाहु नगर बस स्टॉप जवळील बालाजी ज्वेलर्स या सराफी दुकानाचे शटरचे लॉक तोडून चोरट्यांनी सोन्या चांदीचे दागिने व सीसीटीव्ही चा डीव्हीआर चोरून नेल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते २६ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत मुकेश मधुकर दहिवाळ (वय ४३, रा. कौशल्यानगरी, माधवनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दहिवाळ यांचे शाहुनगर बस स्टॉप जवळ बालाजी ज्वेलर्स नावाचे सराफी दुकान आहे. त्यांनी २५ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० च्या सुमारास दुकानाचे शटरला लॉक करून ते घरी गेले. २६ ऑगस्ट रोजी सकाळी त्यांना दुकानात चोरी झाल्याचे समजले.

त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जावून पाहणी केली असता त्यांना दुकानातील सोन्या चांदीचे दागिने व सीसीटीव्हीचा डीव्हीआर चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्यांनी कोतवाली पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली. याबाबत दहिवाळ यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माळीवाड्यातून दुचाकीची चोरी

नगर - माळीवाडा परिसरातील श्री दत्त लॉजच्या पार्किंगमध्ये लावलेली टीव्हीएस कंपनीची अपाचे मोटारसायकल (क्र. एम एच १६ डी एल ५६५९) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी रात्री ९.४५ ते २६ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० या कालावधीत घडली. याबाबत गणेश भाऊसाहेब क्षीरसागर (वय ३२, रा. पाटेवाडी ता. कर्जत) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## शाळांच्या झालेल्या दुरावस्थेच्या प्रश्नावर मनपासमोर 'झोपा काढो आंदोलन'

### प्रश्न सोडविण्याचे आम आदमी पार्टीच्या शिष्टमंडळास उपायुक्तांचे लेखी आश्वासन

नगर - महापालिकेच्या शाळांची झालेली दुरावस्थेच्या प्रश्नावर आम आदमी पार्टी अहिल्यानगरच्या वतीने महापालिकेसमोर झोपा काढो आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेऊन महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. संतोष टेंगले यांनी महापालिकेच्या शाळांच्या दुरावस्थेसंदर्भात तातडीने प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन शिष्टमंडळास दिले आहे.



महापालिकेच्या शाळांची झालेली दुरावस्थेच्या प्रश्नावर आम आदमी पार्टी अहिल्यानगरच्या वतीने महापालिकेसमोर झोपा काढो आंदोलन करण्यात आले होते.

आपच्या पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिकेच्या शाळांना भेटी देऊन तेथील विद्यार्थ्यांच्या समस्या, शाळेची दुरावस्था, शौचालयाची परिस्थिती व पिण्याच्या पाण्याची अवस्था आणि शालेय परिसरात असलेली अस्वच्छतेबाबत महापालिकेकडे तक्रार केली होती. यासंदर्भात कारवाई होत नसल्याने नुकतेच महापालिकेच्या प्रवेशद्वारावर शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ यांच्या नेतृत्वाखाली झोपा काढो आंदोलन करण्यात आले होते. यामध्ये आपचे राज्य सचिव सुभाष केकाण, जिल्हा प्रवक्ता ॲड. महेश शिंदे, महिला शहराध्यक्ष अड. विद्याताई शिंदे, राम लाड, रजनीताई ताठे, शंकर गोरे, सुनील ठाकरे, सिताराम खाकाळ, सचिन एकाडे, बाळासाहेब थोरात आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

राज्यसचिव सुभाष केकाण यांनी महानगरपालिकेच्या तसेच सरकारी शाळांची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. शिक्षणाच्या पवित्र कार्यात देखील अनागोंदी सुरु आहे. प्रशासनाला जागे करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आंदोलन करावे लागत आहे. पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत शिक्षण क्षेत्रात केलेले अमुलाग्र बदल आणि आरोग्य क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा आदर्श घेण्याचे स्पष्ट केले. तर आपच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीन विकास साधला जाणार असून, जनतेच्या सेवेसाठी कार्य सुरु असल्याचे ते म्हणाले.

# गृहिणी

## आरोग्य

कॉफिप्रेमींसाठी आनंदाची बातमी आहे. संशोधकांनी या पेयामधील मुख्य घटक शोधला असून, या घटकामुळे टाइप-२ चा मधुमेह होण्याचा धोका कमी होत असल्याचे आढळून आले आहे. डेन्मार्कमधील अरहूस विद्यापीठाच्या संशोधकांनी याबाबत अधिक संशोधन केले. संशोधकांनी कॉफी या पेयामधील एक घटक शोधला असून, तो पेशींची कार्ये आणि इन्सुलिनची पातळी नियंत्रित करण्यामध्ये मदत करतो. प्रयोगशाळेत करण्यात आलेल्या उंदरावरील प्रयोगात हे स्पष्ट झाले. या शोधामुळे नवीन औषध तयार करण्यात मदत होणार असून, मधुमेह होण्यापासून बचाव करणे शक्य होणार असल्याचे संशोधकांनी सांगितले.

सफरचंद हे फायबरचे सर्वात मोठे स्त्रोत आहे. एका मध्यम आकाराच्या सफरचंदामध्ये ऐंशी कॅलरी असतात. सफरचंदाच्या सालीमध्ये भरपूर पोषकतत्व असतात. एक सफरचंदाचे सेवन करणे म्हणजे एका सलायन घेण्या बरोबरचे आहे. शरीर निरोगी व उत्साही राहण्यासाठी सफरचंद अत्यंत उपयुक्त असे फळ आहे.

## पाककला

### पनीरचे भरले फ्रेंच टोस्ट

**साहित्य** : ८-१० ब्रेड स्लाईसेस, ५-६ ओले खजूर, २ टे. स्पू. बारीक चिरलेले काजू, २ टे. स्पू. मिक्स्ड फ्रुट जाम, ५० ग्रॅम पनीर, अर्धी वाटी दूध, २ टे. स्पू. साखर, २ टे. स्पू. कणीक, चिमूटभर मीठ आणि १/२ टी. स्पू. व्हॅनिला इसेन्स.

**कृती** : कणकेत दूध, साखर आणि कॉर्नफ्लॉवर मिसळून मिश्रण एकजीव करावे. त्यात व्हॅनिला इसेन्स घालावा. खजूर बारीक चिरावेत. पनीर कुस्करून त्यात खजूर, काजू आणि जॅम घालून मिश्रण एकत्र करून ठेवावे. ब्रेडची स्लाईस घेऊन त्यावर पनीरचे मिश्रण दाबून लावावे. त्यावर दुसरी स्लाईस दाबावी. अशी सँडविचेस तयार करून ठेवावीत. निर्लेप पॅनला तुपाचा हात लावून सँडविच तयार मिश्रणात पूर्णपणे बुडवून पॅन तापवून त्यावर एकेक सँडविच सोनेरी तांबूस रंगावर दोन्ही बाजूंनी भाजून घ्यावा.

## सौंदर्य

❊ मानेचे सौंदर्य कायम ठेवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे साय आणि लिंबाचा रस. सायीमध्ये लिंबाचा रस मिसळून मानेभोवती मसाज करावा.

❊ जर आपली त्वचा आमली असेल तर बेसनासारखी दुसरी वस्तू नाही. गुलाब पाण्यात बेसन मिसळून उटणे तयार करा. चेहऱ्यावर व शरीरावर लावा. नंतर स्नान करा.

## सल्ला

दात चमकदार होण्यासाठी लिंबूफोड दातावर चोळावी.

## वास्तू

मधुर संगीत निर्माण करणारे भिंतीवरील घड्याळ घरातील शुभ सकारात्मक उर्जेचे संतुलन करते. असे फेंगशुईने मानले आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २०२५

**ऋषिपंचमी, जैन संवत्सरी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, चित्रा ०८।४४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : साधारणपणे इतर लोकांबद्दल आपली भावनात्मक प्रतिक्रिया आवश्यकतेपेक्षा अधिक असते. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. मागील उधारी उसनवारी वसूल होईल.

**वृषभ** : मानसिक स्थिती आनंददायक राहील. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. आनंदाची बातमी मिळेल. निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका.

**मिथुन** : संभाषणात सावधगिरी बाळगावी लागेल. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा. कार्यात विलंब झाला तरी यश मिळेल. नोकरदारांनी इतर व्यक्तींची मदत घेऊन कामे करावी. बेपर्वाईने वागु नका.

**कर्क** : कौटुंबिक विषयांमध्ये आशादायक काळ आला आहे. खर्च अधिक होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. व्यापार व्यवसायात आशादायक परिणाम मिळतील. आपण मागील केलेला संकल्प पूर्ण होईल.

**सिंह** : जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळा. आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल. आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या** : मित्रांचा पाठिंबा मिळेल. भावनात्मकतेमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. स्वाक्षरी करण्यापूर्वी कागदपत्रे वाचून घ्या. मुले व पत्नी यांच्या आनंददायी सहवासामुळे दिवस आनंदात जाईल.

**तूळ** : मोठ्यांचा सल्ला घ्या. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल. आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे. इच्छित कार्य पूर्ण होतील.

**वृश्चिक** : पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल. इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये वरिष्ठांचा सल्ला घेऊन पाउल टाका.

**धनु** : धर्मविषयक कामामध्ये पैसा खर्च होईल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. आपणास समाधानकारक स्थिती मिळेल. आर्थिक लाभ मिळेल.


**मकर** : आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. कार्यालयामध्ये सहकार्य मिळेल. संपूर्ण दिवसभर वातावरण होकारात्मक राहील. संततीसौख्य लाभेल.

**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. आरोग्य नरम-गरम राहील. खाण्या-पिण्याविषयीची पथ्य पाळावी लागतील.

**मीन** : मित्रांचा सहयोग मिळेल. शुभ वार्ता देखील मिळतील. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल. खाण्या-पिण्यात काळजी घ्या. लोकांची मागील देणी आपण आज चुकती कराल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२५१ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२५० चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) क्षणिक; पातळ; तरळ ४) नीटनेटके; साफसूफ ७) डाका; दरोडा ९) दार; दरवाजा; द्वार ११) दीप; दीपक १२) चरित्र; गद्य इतिहास १४) पुरून उरेल इतके (धन) १६) उपहास; फजिती; हुर्यो १७) यशस्विता; भरभराट १८) विष्णूचा पाचवा अवतार; बुटका माणूस २१) वीस दस्ते कागद २२) विविध सणांचे दिवस २४) ज्याला वतन आहे असा २५) पीकवाढीसाठीचा एक आवश्यक घटक

**उभे शब्द :-** १) एक भाजी २) हेर; खंदक; हाळ ३) कमी वेळेत; जलदी ५) ठावठिकाणा; तपास; शोध ६) एक चर्मवाद्य; पणवानक; मृदंग ८) वाईट; वाम १०) कडपा; ढाळ; उतरण; टेकडी ११) दिशेच्या अंतिम टोकापर्यंत १३) खणखणीत; झणझणीत; तीव्र १५) गोंद; चिकट पदार्थ १९) प्रारंभ; प्रणाम; सुरुवात; वंदन २०) आपला देश २२) माळ; माला; बरोबरी; तुलना २३) धागा; तंतू; दोरा; सूत

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अवदशेत सापडलेला मनुष्य आपल्या नशिबाला दोष देतो; पण स्वतःच्या कर्मांचे दोष तो कधी जाणून घेत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### हिवतापासाठी क्लोरोक्वीन कसे देतात?

तुम्हाला ताप आल्यावर कोणीही पटकन म्हणते की ''मलेरिया झाला असेल.'' मलेरिया वा हिवताप इतका बोकाळला आहे की, कोणताही ताप मलेरिया असू शकतो, असे म्हणता येते. मलेरिया हा एक गंभीर आजार आहे. या आजारात मेंदूवर परिणाम झाल्यास मृत्यूही ओढवू शकतो. म्हणूनच वेळेवर उपचार घेण्याची नितांत आवश्यकता असते.

हिवतापाचे निदान करण्यासाठी ताप आलेल्या व्यक्तीच्या बोटाचे दोन थेंब रक्त घेऊन त्याची सूक्ष्मदर्शक यंत्राखाली तपासणी करतात. या तपासणीत हिवतापाचे जंतू दिसतात. हिवतापाचे निदान झाल्यास उपचार चालू करावे लागतात. यात क्लोरोक्वीन हे औषध अत्यंत महत्त्वाचे ठरते. हिवताप झालेल्या प्रौढ व्यक्तीला क्लोरोक्वीन फॉस्फेटच्या (२५० मि.ग्रॅ. च्या गोळीत १५० मि.ग्रॅ. क्लोरोक्वीन असते) एकूण दहा गोळ्या घ्याव्या लागतात. सुरुवातीला एकदम चार, मग आठ तासांनी दोन, अशा गोळ्या पहिल्या दिवशी देतात. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी दोन-दोन गोळ्या देतात. हिवतापाच्या प्रकारानुसार प्रायमाक्वीन हे औषधही दिले जाते.

क्लोरोक्वीन उपाशीपोटी देऊ नये. कारण त्यामुळे मळमळ होणे, उलट्या होणे, पोटात जळजळ इत्यादी त्रास होऊ शकतो. क्लोरोक्वीनचा परिणाम न झाल्यास क्वीनीन, मेफ्लोक्वीन, मेटाकेल्फीन अशी औषधे वापरता येतात. हिवतापाचे गांभीर्य लक्षात घेता उपचार पूर्ण घेणे अगत्याचे ठरते, अन्यथा हिवताप परत होऊ शकतो किंवा मेंदूवर विपरीत परिणाम होऊन मृत्यू ओढवू शकतो.

## अंधश्रद्धा

विजयनगरच्या राज्यात रामय्या नावाचा माणूस राहत होता. त्याला शहरातील लोक अशुभ मानत होते. जर तो सकाळी दिसला तर त्यांचा संपूर्ण दिवस वाईट जातो असा त्यांचा विश्वास होता. आणि ते दिवसभर उपाशी राहत असत त्यांना काहीही खायला मिळत नसे.

ही गोष्ट राजाच्या कानावरही गेली. सत्य जाणून घेण्यासाठी त्याने रामय्याला आपल्या महालात बोलावले. त्याने त्याच्या सेवकांना त्याच्या खोलीच्या शेजारी असलेल्या खोलीत रामय्याच्या मुक्कामासाठी सर्व सोय करण्याचे आदेश दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी राजा कुणालाही न भेटता रामय्याचे तोंड पाहण्यासाठी त्याच्या खोलीत गेला.


दुपारी राजा जेवायला बसला, पण त्याच्या ताटावर माशी बसल्याने राजा काहीही खाऊ शकला नाही. त्याने स्वयंपाक्याला त्याच्यासाठी दुपारचे जेवण तयार करण्यास सांगितले. दुपारचे जेवण तयार झाले होते, पण कृष्णदेवरायांना आता जेवायची इच्छा नव्हती. राजाने काहीही खाल्ले नसल्याने त्याला कामात लक्ष घालता येत नव्हते. लोक जे काही बोलतात ते खरेच होते हे त्याच्या लक्षात आले. अशाप्रकारे त्याने रामय्यासारख्या माणसाने जगू नये असा निर्णय घेतला आणि आपल्या सैनिकांना त्याला फाशी देण्याचा आदेश दिला. सैनिकांना त्याला फासावर लटकवायचे नव्हते, परंतु ते त्यांच्या राजाची आज्ञा मोडू शकले नाहीत. आपल्या पतीच्या शिक्षेबद्दल कळल्यानंतर रामय्याची पत्नी तेनालीची मदत घेण्यासाठी धावली. खूप दुःख आणि डोळ्यातून अश्रू सांडत तिने तेनालीला सगळं सांगितलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी शिपाई रामय्याला फाशी देण्यासाठी घेऊन जात असताना वाटेत त्यांना तेनाली भेटला. तेनालीने रामय्याच्या कानात काहीतरी सांगितले आणि तो निघून गेला. जेव्हा रक्षकांनी रामय्याला फाशी देण्यापूर्वी त्याची शेवटची इच्छा विचारली तेव्हा त्याने सांगितले की त्याला राजाला एक चिठ्ठी पाठवायची आहे.

रक्षकाने ती चिठ्ठी राजाकडे दिली. राजाने ती चिठ्ठी वाचली. त्या चिठ्ठीमध्ये लिहिले होते की, माझा चेहरा पाहिल्यास दिवसभर भूक लागत नाही, तर जो माणूस राजाचा चेहरा पाहतो, त्याला सकाळी प्राण गमवावे लागते. मग अधिक शापित कोण- तो किंवा राजा? राजाला अर्थ समजला आणि त्याने रामय्याला मुक्त केले.

तात्पर्य : अंधश्रद्धेवर कधीही विश्वास ठेवू नका.

## जीवन का अमृत (भाग १)



हमारे कर्म आग के माफ़िक हैं; जब तक वह आग बुझेगी नहीं, जब तक कर्म कटेंगे नहीं, तब तक हम उनमें जलते रहेंगे । जब तक कर्म हमारी आत्मा के साथ जडे रहेंगे तब तक हम ८४ लाख योनियों के चक्कर में भटकते रहेंगे । हमारी आत्मा, हमारी रूह एक योनि से दूसरी योनि में, दूसरी योनि से तीसरी योनि में भटकती रहेगी । जब आग लगती है, तो उसे पानी डालकर बुझाया जाता है, या हम आग पर लकड़ी से वार करते हैं, ताकि वह ख़त्म हो जाए या बहुत बड़ा कपड़ा डाल देते हैं (यदि आग छोटी हो) ताकि उसे रोक सकें । तो जिस आग में इंसान जल रहा है, जिसमें हमारी आत्मा जल रही है, वह कर्मों की आग है और जिस

### गुरू और परमात्मा

तरह हम बाहर की आग को रोकते हैं, महापुरुष कह गए हैं कि वैसे ही कर्मों की आग को रोका जा सकता है । कैसे रोका जा सकता है ? वही यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

**ताती वाउ न लगई पाखहम सरणाई ।**

जब हम पारब्रह्म की शरण में आ जायें, पारब्रह्म से यहाँ अर्थ ब्रह्म से पार होना है, जो कि चौथा मंडल है, जो काल के दायरे से ऊपर है, उसी की यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज बातचीत कर रहे हैं । पारब्रह्म से मतलब ब्रह्म से आगे होना है, ब्रह्म के मंडल से पार होना है । नीचे के तीन मंडल- पिंड, अंड और ब्रह्मंड से पार हों और उसके आगे परमात्मा है । पारब्रह्म, यहाँ परमात्मा को पुकारा गया है । परमात्मा ने पाँच मंडल बनाये हैं । उसमें से नीचे के तीन मंडल काल के दायरे में हैं । जब हम उसके दायरे से बाहर निकल जाते हैं और परमात्मा की शरण में पहुँच जाते हैं तो हमें गर्म हवा नहीं लगती हम कर्मों के चक्कर से बाहर निकल जाते हैं ।

अभी हम इस दुनिया में जी रहे हैं, तो उस परमात्मा से कैसे मिलें ? उसकी शरण में हम कैसे पहुँचें ? इसके बारे में महापुरुषों ने हमें बार बार यही समझाया है कि हम किसी संत-महात्मा, किसी साधु की संगत करें । किसी जीवित महापुरुष की शरण में पहुँचें, ऐसे महापुरुष, जो इस धरती से लेकर सचखंड तक आते जाते हों, ऐसे महापुरुष, जो काल के दायरे से बाहर हों, ऐसे महापुरुष,

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

यह प्रयोग प्रतिदिन एक ही समय, एक ही जगह बैठकर एक ही विधि से करना है । इसके लिए चाहे खेती में बैठो या कहाँ भी - खेती से कितना भी दूर, घर में बैठकर भी कर सकते हैं । सिर्फ नियम और विधि में बदलाव न हो । पहले पांच तत्वों को और ग्रह तारों को, फिर प्रयोग वाली जमीन और फसल को - इस प्रकार योग द्वारा परमात्म शक्तियों की अनुभूति करायें ।

दिन भर में जो भी समय मिले तब पाँच मिनट के लिए खेती में या कहाँ भी बैठकर एकाग्रता से योग की अनुभूति करें और जमीन तथा फसल को भी करायें । ऐसी योगयुक्त अवस्था से, स्नेह और प्रेम से फसल को दृष्टि से निहाल करें, अपनी शुभ भावनाओं की लेन देन करें, अपनेपन की बातें करें । जमीन से माँ का रिश्ता जोड़कर बातें करें और फसल के साथ बच्चों की तरह वार्तालाप करें, प्यार से पालना करें ।

### आज्ञा चक्र

खेती में कोई भी कर्म करते समय, चाहे जमीन में खाद मिलाते समय या फसल को पानी देते समय, घासफूस निकालते समय, टॉनिक या कीटरोधक छिड़कते समय अपने आत्मिक स्वरूप में रहकर परमात्मा पिता की याद में कर्म करने से खाद, टॉनिक और कीटरोधक की कार्यक्षमता बढ़ेगी और बहुत ही सुन्दर और चमत्कारिक परिणाम दिखाई देंगे।

योग के प्रयोग में अपने सूक्ष्म शरीर (फरिश्ता स्वरूप) द्वारा, अपनी प्रयोग वाली खेती को सूक्ष्म वतन में बापदादा के सम्मुख ले जाकर बापदादा द्वारा सकाश अर्थात् वायब्रेशन देकर जमीन और फसल को और शक्तिशाली बनाएँ । सूक्ष्मवतन - जहाँ आत्मा का सम्पूर्ण स्वरूप, इस साकार जगत (पाँच तत्वों के मांडवे) से पार सूक्ष्म जगत् में निवास करता है जिसे लाइट का वतन, अव्यक्त वतन वा सूक्ष्म वतन कहा जाता है। कभी अपने शक्तिशाली शुभ संकल्पों के माध्यम से अपनी प्रयोगवाली खेती की फसलों को परमधाम की गहन शक्तियों के प्रकंपन से निरोगी और शक्तिशाली बनाएं । (परमधाम - जो आत्मा और परमात्मा का मूल रहने का स्थान है, जो इन पाँच तत्वों से पार लाल सुनहरा प्रकाश ही प्रकाश तत्व है, जिसे ब्रह्माण्ड भी कहते हैं)

ऐसे ही कभी बापदादा का नीचे आह्वान करके जमीन और फसल को बापदादा अपनी दृष्टि से निहार रहे हैं, अपनी शक्तियों से निरोगी और शक्तिशाली बना रहे हैं । ऐसा अभ्यास और अनुभव करें । (बापदादा - ब्रह्मा बाप के माध्यम में शिवबाबा जब प्रवेश करते है तब ब्रह्मा को पिता और शिवबाबा को दादा अर्थात् ग्रँडफादर कहते हैं ।)

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आई : बाळू मी तुला बागेतून पूजेसाठी फुलं तोडून आणण्यास सांगितलं. तू तर पूर्ण फांदीच तोडून घेऊन आलास.

बाळू : आई बागेत बोर्डावर लिहिलं होतं, की फुलं तोडण्यास सक्त मनाई आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ पहिल्या खो खो विश्वचषक स्पर्धेच्या अंतीम सामन्यात भारतीय पुरुष व महिलांच्या संघाने कोणत्या देशास हरविले? - नेपाळ

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

स्त्री आरोग्याची माहिती घ्यायची असेल, तर सर्वांत पहिल्यांदा आपल्याला स्त्री शरीराची रचना व कार्य समजून घेणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे एखादे मशीन बिघडले, तर ते दुरुस्त करण्याआधी त्याची संपूर्ण रचना व काम करण्याची पद्धत माहीत असणे आवश्यक असते. त्याप्रमाणे स्त्री आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर आधी स्त्री शरीररचना व कार्य समजावून घेणे गरजेचे आहे.

जन्म झाल्यानंतर बाह्य जननेंद्रियांवरुन मुलगा आहे की मुलगी हे ओळखले जाते. बाल वयातील मुलीला स्त्रीत्वाची जाणीव नसते. फक्त तिच्या आवडीनिवडी मुलांपेक्षा वेगळ्या असतात. परंतु मुलींमध्ये रजोदर्शन सुरू होणे हे स्त्रीत्वाचे लक्षण मानले जाते.

**तद् वर्षात द्वादशात् काले वर्तमानमसृक पुन: ।**
**जरा पक्व शरीराणां याति पंचाशत: क्षयम् ।।**

(सु.शा.अ.३-११)

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

सुश्रुतचार्यांनी हा काळ सामन्यत: वयाच्या बारा वर्षापासून ते पन्नास वर्षापर्यंत असतो, असे सांगितले आहे. **स्त्रियांची जननेंद्रिये प्रामुख्याने दोन प्रकारांत विभागली गेली आहेत :**

१) प्रधान जननेंद्रिये २) दुय्यम जननेंद्रिये

**१) प्रधान जननेंद्रिये :** गर्भधारणा व प्रसूती कार्यामध्ये ज्या अवयवांचा प्रामुख्याने सहभाग असतो, त्या अवयवांना प्रधान जननेंद्रिये असे म्हणतात.

**२) दुय्यम जननेंद्रिये :** नवजात बाळाच्या पोषणाचे कार्य मातेच्या दुधावर अवलंबून असते. परंतु गर्भधारणा व प्रसूती यामध्ये स्तन या अवयवाचा प्रत्यक्ष सहभाग नसतो; म्हणून स्तनांना दुय्यम जननेंद्रिये असे म्हटले आहे.

**प्रधान जननेंद्रिये दोन भागांत विभागली आहेत : अ) बाह्य जननेंद्रिये :** गुप्तांग आणि योनिमुख यांचा समावेश बाह्य जननेंद्रियांमध्ये होतो. बाह्य जननेंद्रियाची आकृती दिली आहे. त्यावरुन अवयवांची ओळख करुन घ्यावी. गुप्तांगाचे खालील भागांत विभाजन केले आहे.

**१) योनिसंपत् :** योनीचा बाह्यभाग हा बहिर्गोलाकार असतो. हा भाग पुष्ट असून त्रिकोणी शंकरपाळीच्या आकाराचा व केसांनी आच्छादलेला असतो. बाह्य जननेंद्रियांचे संरक्षण या केसांमुळे होते. २) मदनध्वज - योनीच्या खाली बाणासारखा दिसणारा अतिशय संवेदनाक्षम व नाजूक असा हा अवयव असतो. शारीरिक संबंधावेळी संवेदनांच्या दृष्टीने हा फार महत्त्वाचा असतो.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# गणेशोत्सवाच्या निमित्ताने... गणेशोत्सव कालचा आणि आजचा

निनाद चल, बाकी सगळं झालयं, तुझ्या मम्मीकडून आणि पठारे काकूंकडून दोन चार सुंदर साड्या घेऊन येऊ ! त्या मागे लावल्या की बाप्पाचं डेकोरेशन पुर्ण होईल. १९९० चा काळ होता तो, स्थळ होतं इरिगेशन कॉलनी, मिरजगाव, अहमदनगर आता जलसंपदा झालं. त्याकाळी गणेशोत्सव १० दिवसांचा असायचा, नाही म्हणजे आताही असतोच. परंतु त्या काळी तो सांस्कृतिक आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाने नटलेला असायचा.

आमचं बाल गणेश मंडळ होतं. मोठ्या लोकांचा मोठा मंडप असायचा ! त्यांचे कार्यक्रम पनं मोठे असायचे. गणपतीच्या शेवटच्या चार पाच दिवसात वेगवेगळे कार्यक्रम असायचे. एक दिवस नाटक किंवा ऑर्केस्ट्रा, एक दिवस मराठी चित्रपट, एक दिवस हिन्दी चित्रपट, एक दिवस जादूचे प्रयोग असं असायचं. १९८९-९० चं वर्ष होतं. मी, निनाद गडकरी, संदिप जोशी एकाच वर्गात म्हणजे आठवी-नववीला होतो. आमच्या जोडीला मगं संभाजी कोल्हे, इमरान शेख, बापू कांबळे, अरविंद रासकर, नितीन भोंडवे, शकोर सैय्यद, संजय बन, गणेश धुमाळ, समिर सैय्यद, प्रविण फुले ही सगळी मंडळी होती.

यावेळी आम्ही ठरवलं होतं, मोठ्या लोकांप्रमाणे आपणही आपला स्वतंत्र गणपती बसवायचा.



प्राथमिक चर्चेत असं लक्षात आलं की आपण जबाबदाऱ्या वाटल्या आणि थोडीशी मोठ्या लोकांची मदत घेतली तर काही अवघडं नव्हतं. गणपती मंडळाला अध्यक्ष असतो, मग सर्वानुमते मला अध्यक्ष जाहीर केलं गेलं. आरती आणि प्रसादाची जबाबदारी रोज एका कुटूंबावर सोपविण्यात आली, आणि त्यांनी सुद्धा ती आनंदाने स्विकारली होती. आम्ही छोटासा मंडप उभारला होता. तसं सगळं सुरळीत चाललं होतं, पण मुख्य अडचण पैशांची होती. आम्हाला धुमधडाक्यात यावर्षी गणेशोत्सव साजरा करायचा होता, त्यासाठी नाही म्हटलं तरी ५००-६०० रुपयांची गरज होती. मग आम्ही वर्गणी गोळा करायचं ठरवलं. कॉलनीतल्या प्रत्येक घरात जाऊन वर्गणी मागीतली, तरी जेमतेम ३०० रुपये जमा झाले होते. मग आम्ही आसपासची दुकाने, वाड्या वस्त्या फिरलो आणि सरतेशेवटी आमच्याकडे ६००-६५० रुपये जमा झाले होते. आता त्यातून गणपतीची मूर्ती, मागे लावायला पंखे, झिरमिळ्या, लाईटची माळ सगळं करुन सुद्धा ३०० रुपये शिल्लक होते. त्या पैशातून आम्ही व्हि. सी. आर वर दोन चित्रपट दाखवायचं ठरवलं होतं. मग आम्ही मिरजगावच्या त्याकाळी प्रसिद्ध असणाऱ्या सोना व्हिडिओ हॉल शी संपर्क साधला. दोन दिवशी दोन सिनेमे ठेवले होते. पहिल्या दिवशी नाम आणि दुसर्या दिवशी कर्मा. चित्रपट व्हि. सी.आर. वर असूनसुद्धा मोठ्या लोकांच्या मोठ्या पडद्यावरच्या चित्रपटांपेक्षा आमचे चित्रपट लोकांना खूप आवडले होते.

गणेश विसर्जनासाठी कॉलनी तून गाड्या निघायच्या, त्या थेट निमगांव गांगर्डा येथील सिना धरणापर्यंत. आम्ही नाचत, गुलाल खेळतं मिरवणुकीत जायचो. त्यावेळी आम्हाला कधीही कुणीही सांगितले नाही. तुम्ही मुस्लिम आहात, हा हिंदूंचा सन आहे, तुम्ही यात सहभागी होऊ नका. आणि कुणी मुसलमानाने सुद्धा सांगितले नाही की तुम्ही मिरवणुकीत गेलात तर तुमचा धर्म भ्रष्ट होईल. दिंडीचं जेवणं तर उस्मान काकांचा हात लागल्याशिवाय तयारचं होतं नव्हतं. आज मागे वळून पहाताना खूप काही हरवल्या सारखं वाटतं. खरचं धर्म इतका कमकुवत आहे का? एक दुसऱ्या धर्माच्या लोकांच्या सहभागामुळे भ्रष्ट होईल? शिरखुर्म्याचा आस्वाद घेताना कुणालाही कधी असं वाटलं असेल का? शेवटी परमेश्वर / अल्लाह तुमच्या कृती पेक्षा तुमची श्रद्धा / इमान बघतो. माणुसकी ही धर्माची पहिली शिकवण का आपणं विसरून गेलो?...असो !

ते सोनेरी दिवस पुन्हा यावेत हिच अपेक्षा करुन थांबतो. पुन्हा एकदा गणेश चतुर्थीच्या सर्व मित्रपरिवारास हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

**- इंजि. अनिस शेख, मो. ९८५०९००७८६**



अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेशाच्या आरतीचे प्रकाशन जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते श्री विशाल गणेश मंदिरात उत्साहात झाले.

## श्री विशाल गणेश आरतीचे मंदिरात उत्साहात प्रकाशन

नगर - अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेशाच्या आरतीचे प्रकाशन जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते श्री विशाल गणेश मंदिरात उत्साहात झाले.

यावेळी आरतीचे रचयिता महंत संगमनाथजी महाराज, देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोक कानडे, विजय कोथिंबिरे, ज्ञानेश्वर रासकर, माणिकराव विधाते, चंद्रकांत फुलारी, संजय चाफे यासह विश्वस्त उपस्थित होते. देवस्थानच्या वतीने गायक संगीतकार राजेंद्र टाक यांचा पोलिस अधीक्षक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्या स्वरातील ही rajendra tak आरती यू ट्यूब या सोशल मीडियावर भाविकांना ऐकायला पाहायला मिळणार आहे.

## गणेशोत्सवात विधायक कामे करावीत


लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठ्या भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तींचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते.

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी.

काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

## कवयित्री सरोज आल्हाट यांच्या 'सखे' काव्यसंग्रहास पुरस्कार






नगर - धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने अहिल्यानगर मधील कवयित्री सरोज आल्हाट यांच्या सखे या काव्यसंग्रहास राज्यस्तरीय बहिणाबाई चौधरी उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. महिलांच्या भावविश्वाचे अंतरंग उलगडणारा हा काव्यसंग्रह असून, त्याची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती माहिती संमेलनाचे संयोजक व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.

हा पुरस्कार ५ सप्टेंबर, शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे होणाऱ्या तिसऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात आल्हाट यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. कवयित्री सरोज आल्हाट गेल्या ३० वर्षापासून साहित्य, समाजसेवा आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे मराठी आणि इंग्रजीतही काव्य संग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांना अनेक राज्य व राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

# महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील १० हजारांपेक्षा अधिक घरांमध्ये होणार शाडू मातीच्या गणेश मूर्तींची स्थापना

### कार्यशाळेच्या उपक्रमाला विश्वविक्रमासाठी मिळाले नामांकन, उपक्रमात सहभागी होणाऱ्या शाळा, महाविद्यालयांचा होणार गौरव : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या संकल्पनेस प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत शहरातील दहा हजारांपेक्षा अधिक घरांमध्ये शाडू मातीच्या गणेशाची प्रतिष्ठापना होणार आहे. (छाया - लहू दळवी)

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या संकल्पनेस प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत शहरातील दहा हजारांपेक्षा अधिक घरांमध्ये शाडू मातीच्या गणेशाची प्रतिष्ठापना होणार आहे. शहरातील शेकडो शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर महानगरपालिका व पर्यावरणदूत, सामाजिक संस्थांच्या माध्यमातून आयोजित कार्यशाळांमध्ये शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनवल्या. उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादामुळे या उपक्रमाला विश्वविक्रमासाठी नामांकन मिळाले आहे. महानगरपालिकेच्या वतीने सर्व शाळांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

यशवंत डांगे यांच्या पुढाकार व मार्गदर्शनातून पर्यावरण पूरक गणेशोत्सव संकल्पना व उपक्रम शहरात राबविण्यात आले. यात पर्यावरण दूत डॉ. अमोल बागुल, बालाजी वल्लाळ, सतीश गुगळे तसेच विविध सामाजिक स्वयंसेवी संस्था, संघटना आदींनी हजारो विद्यार्थ्यांना शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनवण्यासाठी कार्यशाळेतून प्रोत्साहन दिले. या सर्व शाळा महाविद्यालय व सामाजिक संस्थांचा मनपाच्यावतीने गौरव पत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

यशवंत डांगे म्हणाले, या संकल्पनेमुळे गणेशोत्सव निश्चितच पर्यावरणासाठी प्रेरक ठरणार आहे. शाडू मातीची मूर्ती वापरू या, नैसर्गिक रंगांचा वापर करू या, पीओपी आणि प्लास्टिक ला नाही म्हणू या, कृत्रिम विसर्जन टाक्यांचा उपयोग करू या.. या चतु:सूत्रीमुळे माझी वसुंधरा अभियानाचा उद्देश व उद्दिष्टही सफल होणार आहे. शहरांतील विविध माध्यमांच्या प्राथमिक, माध्यमिक, तसेच महाविद्यालयांनी अभियानात सहभाग घेतला. उपक्रमासाठी विविध शाळा, महाविद्यालयांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, प्राध्यापक, पालक, विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. उपक्रमासाठी मनपाचे अधिकारी, कर्मचारी तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाने परिश्रम घेतले.

## फिरोदिया शिवाजीयन्स इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेत खेळाडूंचे रंगतदार प्रदर्शन

### मुलींमध्ये ऑक्झिलियम कॉन्व्हेंट, तर मुलांमध्ये ऑक्झिलियम कॉन्व्हेंट, द आयकॉन पब्लिक स्कूलची विजयी घोडदौड



नगर - फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत शालेय खेळाडूंचे रंगतदार सामने होत आहे. १२, १४ व १६ वर्ष वयोगटातील खेळाडूंचे संघ उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत असून, अटीतटीचे सामने होत आहे. तर पहिल्याच दिवसापासून मुलींच्या संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. मुलींमध्ये ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल, तर मुलांमध्ये ऑक्झिलियम कॉन्व्हेंट व द आयकॉन पब्लिक स्कूलची विजयी घोडदौड सुरु झाली आहे.

अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत २६ ऑगस्ट रोजी ७ वर्षाखालील मुलींच्या गटात पोदार इंटरनॅशनल स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूल मध्ये झालेल्या सामन्यात आठरे पाटील स्कूलची वेदिका ससे हिने एकामागेएक सलग ३ गोल केले. यामध्ये ०-३ गोलने आठरे पाटील स्कूल संघाने विजय मिळवला.

१४ वर्ष वयोगटात (मुले) आठरे पाटील स्कूल विरुध्द ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलमध्ये अटातटीचा सामना रंगला होता. यामध्ये अर्णव नाकाडे याने १ गोल करुन ०-१ गोलने ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलला विजय मिळवून दिला.

दुपारच्या सत्रात १६ वर्षा खालील मुलींमध्ये द आयकॉन पब्लिक स्कूल विरुध्द ऊर्जा गुरुकुल संघात अटातटीचा सामना रंगला होता. दोन्ही संघांना शेवटच्या क्षणा पर्यंत एकही गोल करता आला नाही. हा सामना अनिर्णित राहिला.

१२ वर्ष वयोगटात (मुले) द आयकॉन पब्लिक स्कूल विरुध्द ऊर्जा गुरुकुल संघाचा सामना देखील ०-० गोलने शेवट पर्यंत अनिर्णित राहिला.

१४ वर्ष वयोगटात (मुले) द आयकॉन पब्लिक स्कूल विरुध्द डॉन बॉस्को स्कूल मध्ये रंगलेल्या सामन्यात द आयकॉन पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी आक्रमक खेळी करुन तब्बल ५ गोल केले. यामध्ये ओम लोखंडे, मयंक बजाज, विराज पिसे यांनी प्रत्येकी १ तर इशान गरड यांने २ गोल केले. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही. ५-० गोलने द आयकॉन पब्लिक स्कूलचा संघ विजयी ठरला.

१६ वर्ष वयोगटात (मुले) द आयकॉन पब्लिक स्कूल विरुध्द डॉन बॉस्को झालेल्या रंगतदार सामन्यात युवान शर्मा याने १ गोल करुन १-० ने द आयकॉन पब्लिक स्कूलला विजय मिळवून दिला. स्पर्धेचे पंच म्हणून सलमान शेख, प्रियंका आवारे, सोनिया दोसानी, प्रकाश कनोजिया, महिमा पठारे, सुर्य नैना, पूजा भिंगारदिवे, जॉय शेळके, अभय साळवे, विल्यम राज हे काम पाहत आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी फिरोदिया शिवाजीयन्सचे सदस्य परिश्रम घेत आहे.

शहरात फुटबॉल खेळ रुजविण्यासाठी आणि नवोदित खेळाडूंना चालना देण्यासाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या माध्यमातून दरवर्षी इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेचे आयोजन केले जाते. शालेय वयातच उत्कृष्ट खेळाडू घडून मोठे व्हावे, या उद्देशाने मागील ६ वर्षापासून या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातून शालेय संघ सहभागी होत असून, यावर्षी तब्बल ४७ संघांनी सहभाग नोंदवला आहे.



अहिल्यानगर जिल्हा रोलबॉल संघटना व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी होणाऱ्या जिल्हा, विभाग व राज्यस्तर स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हास्तर रोलबॉल पंच परिक्षा यशस्वीरित्या पार पडली.

## अहिल्यानगर जिल्हास्तर रोलबॉल पंच परिक्षा यशस्वीरित्या पार

नगर - अहिल्यानगर जिल्हा रोलबॉल संघटना व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय याच्या संयुक्त विद्यमाने आगामी होणाऱ्या जिल्हा, विभाग व राज्यस्तर स्पर्धाच्या तयारी साठी २४ ऑगस्ट रोजी पंच परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदर पंच परिक्षा लेखी व प्रात्यक्षिक स्वरुपात संस्थेचे अध्यक्ष प्रदीप पाटोळे, सचिव प्रशांत पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी रित्या पार पाडल्या.

परिक्षेसाठी जिल्ह्यातील एकूण ३० क्रीडा मार्गदर्शक व क्रीडाप्रेमी यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये श्रीरामपूर, श्रीगोंदे, पाथर्डी, संगमनेर, भिंगार शहर, अहिल्यानगर शहर, सोलापूर, सुपा, येथील परिक्षार्थीनी सहभाग घेतला. ३० पैकी १३ पंचांना उत्तीर्ण झाल्याबद्दल सन्मान पर प्रशस्ती प्रत्रक व ओळख पत्र देण्यात आले.

सदर पंच परिक्षेतील उत्तीर्ण पंच कु. पृथ्वी प्रदीप पाटोळे, कु. सिया गुंदेचा, कु. दर्शना काठेड, कु. सोनाली कुलकर्णी, कु. तनुश्री नन्नवरे, सौ. सविता मकासरे, सौ. प्रतिक्षा अल्हाट, मनोज अहिर, अक्षय चौधरी, अक्षय सारवाण, पियुष कदम, संस्कार कुलकर्णी, प्रसाद पाटोळे, ऋषिकेश नवले, संतोष दूत, संजय हजारे, प्रवीण गायकवाड, विशाल साळवे, सचिन गायकवाड, नितीन गायधने वरील सर्व परिक्षार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले.

परिक्षार्थीना पुढील स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे व प्रवीण कोंडावळे यांनी शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या उपाध्यक्ष सौ. सविता पाटोळे यांनी आभार मानले.

# विज्ञान आणि जैन धर्म

जैन धर्म केवळ एक श्रद्धा प्रणालीच नाही तर एक सखोल वैज्ञानिक दृष्टिकोन देखील सादर करतो. हजारो वर्षांपूर्वी जैन आचार्य आणि ऋषीमुनींनी मांडलेली तत्वे आता आधुनिक विज्ञानाद्वारे सिद्ध होत आहेत. यामुळे हे सिद्ध होते की प्राचीन जैन ग्रंथांमध्ये दिलेली माहिती किती प्रामाणिक आणि वैज्ञानिक होती.

जैन धर्मात असे म्हटले आहे की विश्व अनंत आहे, त्याला सुरुवात किंवा शेवट नाही. आधुनिक भौतिकशास्त्र, विशेषतः 'बिग बँग थिअरी' आणि 'बिग क्रंच थिअरी', हे सिद्ध करते की विश्वाचा सतत विस्तार होत आहे आणि ती एक अनंत प्रक्रिया आहे. जैन ग्रंथांमध्ये पंचस्तिकाय (धर्मस्तिकाय, अधर्मस्तिकाय, आकाशस्तिकया, पुद्गलस्तिकया आणि जीवस्तिकया) यांचा उल्लेख आहे, जे पदार्थ आणि उर्जेच्या विविध रूपांचे तपशीलवार वर्णन करतात. आधुनिक विज्ञान देखील पदार्थ आणि ऊर्जा यांना विश्वाचे मूलभूत घटक मानते. जैन ग्रंथांमध्ये हे स्पष्टपणे सांगितले आहे की सूक्ष्मजीव पाणी, हवा, माती आणि वनस्पतींमध्ये अस्तित्वात असतात. महावीर स्वामींच्या काळात सूक्ष्मजीवांची ही संकल्पना सिद्ध करण्यासाठी सूक्ष्मदर्शक यंत्र नव्हते, परंतु आज विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की पाणी, हवा आणि माती सूक्ष्मजीवांनी भरलेली आहेत.

जैन धर्म शाकाहार आणि अहिंसा यांना सर्वात महत्वाचे मानतो. आधुनिक वैद्यकीय शास्त्राने देखील हे सिद्ध केले आहे की शाकाहारी अन्न आरोग्यासाठी फायदेशीर आहे आणि ते अनेक रोगांना प्रतिबंधित करण्यास मदत करते. याशिवाय, प्राण्यांच्या हक्कांसाठी आणि पर्यावरण संतुलनासाठी शाकाहारालाही प्रोत्साहन दिले जात आहे. जैन आहारात केवळ शाकाहारच नाही तर सात्त्विकता आणि पचन यांनाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. जैन आहारशास्त्र म्हणते की अन्न ताजे, हलके आणि सहज पचणारे असावे. जास्त तळलेले, मसालेदार आणि बाजारातील अन्न आरोग्यासाठी हानिकारक आहे. आजच्या आधुनिक विज्ञानाने हे देखील सिद्ध केले आहे की प्रक्रिया केलेले अन्न आणि जास्त तळलेले अन्न अनेक आजारांना कारणीभूत ठरू शकते.

जैन धर्मात तामसी पदार्थांचे सेवन निषिद्ध आहे कारण त्यांचा मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. तामसी अन्नामध्ये लसूण, कांदा, मांसाहारी पदार्थ, मद्य आणि मादक पदार्थ इत्यादींचा समावेश होतो. आधुनिक विज्ञानाने हे देखील सिद्ध केले आहे की हे पदार्थ मानसिक अस्थिरता, उच्च रक्तदाब, ताण आणि आक्रमक प्रवृत्तींना प्रोत्साहन देतात. जैन धर्मात असे म्हटले जाते की तामसी पदार्थांचे सेवन केल्याने मन अस्थिर होते, ज्यामुळे आध्यात्मिक प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात. मादक पदार्थ आणि मांसाहार आरोग्यासाठी हानिकारक आहेत आणि त्यामुळे अनेक गंभीर आजार होतात हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे.

जैन धर्मात कोमट पाणी पिण्याची परंपरा आहे, ज्यामुळे शरीरातील हानिकारक जीवाणू आणि विषाणू नष्ट होतात. आधुनिक वैद्यकीय शास्त्र हे देखील सिद्ध करते की गरम पाणी पिल्याने पचनसंस्था सुधारते, विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. जैन धर्मात, पाणी गाळून पिण्याचा नियम आहे, जेणेकरून त्यात असलेले सूक्ष्मजीव वाचू शकतील. आज विज्ञान असेही म्हणते की अशुद्ध पाणी अनेक आजारांना कारणीभूत ठरते, म्हणून ते गाळून किंवा उकळून पिणे अधिक सुरक्षित आहे.

जैन धर्मात रात्रीचे जेवण वर्ज्य करण्याची परंपरा आहे. सूर्यास्तानंतर खाल्ल्याने पचनक्रिया मंदावते, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि इतर आरोग्य समस्या उद्‌भवू शकतात हे वैज्ञानिकदृष्ट्या देखील सिद्ध झाले आहे. म्हणूनच आजकाल 'अधूनमधून उपवास' सारख्या तंत्रांना आरोग्यासाठी फायदेशीर मानले जात आहे.

जैन धर्मात उपवास आणि आयंबिल यांचे विशेष महत्त्व आहे. उपवास हा केवळ एक धार्मिक विधी नाही तर तो शरीर आणि मन शुद्ध करण्याची एक वैज्ञानिक पद्धत देखील आहे. आधुनिक विज्ञानाने हे देखील सिद्ध केले आहे की उपवास शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतो, पचनसंस्थेला आराम देतो आणि चयापचय सुधारतो. एकासन, उपवास, आयंबिल इत्यादी जैन उपवासांचे विविध प्रकार आहेत. आयंबिलमध्ये, अतिशय साधे, मसाले नसलेले अन्न खाल्ले जाते, जे शरीराला विषमुक्त करण्यास मदत करते. आजच्या काळात, 'डिटॉक्स डाएट' आणि 'फास्टिंग थेरपी' सारख्या तंत्रांना आधुनिक वैद्यकीय शास्त्र देखील स्वीकारत आहे.

जैन धर्मात निसर्गोपचार आणि आयुर्वेदाला महत्त्वाचे स्थान आहे. महावीर स्वामींनी वनस्पती आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व स्पष्ट केले होते. आज आधुनिक वैद्यकीय शास्त्र देखील हर्बल औषधे आणि आयुर्वेदिक वैद्यकीय पद्धतींना प्रभावी मानते.

हजारो वर्षांपूर्वी जैन धर्मग्रंथांमध्ये जे सांगितले गेले होते ते आधुनिक विज्ञानाच्या तत्त्वांशी सुसंगत आहे हे स्पष्ट आहे. यावरून हे सिद्ध होते की जैन धर्म हा केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नाही तर तो एक वैज्ञानिक जीवनशैली देखील प्रदान करतो. आज विज्ञान देखील जैन जीवनशैली स्वीकारत आहे आणि त्यावर सतत संशोधन केले जात आहे. जर आपण जैन संस्कृतीची मूलभूत तत्त्वे आपल्या जीवनात अंगीकारली तर ते केवळ आध्यात्मिक प्रगतीसाठीच नव्हे तर वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही फायदेशीर ठरेल. असे बरेच विषय आहेत, शब्दांच्या मर्यादेमुळे मी ते इथेच संपवतो.

लेखक – **प्रा. जवाहर मुथा**

# अजरामर पार्श्वगायक मुकेश



आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपट सृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा स्मृतिदिन. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या.

१९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले.

गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या 'पहिली नजर' या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले.

'मेला' आणि 'अंदाज' या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. 'अंदाज' हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंतर राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. स्मृतिदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

# शालेय बॉक्सिंग स्पर्धेत वैभव पाटोळे याचे यश



नगर – रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन संचलित सेठ नंदलाल धूत शाळेतील बॉक्सिंग स्पर्धेत वैभव प्रदीप पाटोळे याने उत्कृष्ट कामगिरी केली. २५ ऑगस्ट रोजी झालेल्या शालेय बॉक्सिंग स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांमध्ये २८ ते ३० किलो वजन गटात वैभव पाटोळे यांनी सुवर्णपदक पटकावले. शालेय पुणे विभागीय स्पर्धेत वैभव पाटोळे याची निवड झाली.

या यशाबद्दल क्रीडा शिक्षक अजित लोळगे, दीपक सर, प्रशिक्षक प्रदीप पाटोळे यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य सौ. राधिका जेऊरकर, टीम टॉपर्स स्केटिंग ॲकॅडमीचे संचालक प्रशांत पाटोळे यांनी त्याचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# २५ वर्षे विना अपघात सेवा देणाऱ्या एसटी चालकांचा सपत्नीक सन्मान

## सेवानिवृत्त कामगारांच्या हक्कासाठी संघटनेचा संघर्ष फळास

नगर – एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालयात नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त चालकांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. सेवेत असताना २५ वर्षे विना अपघात सेवा देणाऱ्या चालकांना प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांच्या हस्ते चालक सतीश श्रीराम, अकुंश लोंढे, सुनिल क्षीरसागर, अशोक भैलुमे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त संघटनेचे केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे, खजिनदार विठ्ठल देवकर, संघटक प्रमोद गाडळकर, महामंडळाचे अधिकारी, पदाधिकारी, कामगार उपस्थित होते.



एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालयात नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त चालकांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

एसटी महामंडळातील चालकांनी कार्यरत असताना २५ वर्षे विना अपघात सेवा दिली होती. मात्र त्यांचा योग्य सन्मान झालेला नव्हता. यासाठी राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना, अहिल्यानगर विभागाने सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर अखेर चालकांना त्यांचा हक्काचा सन्मान मिळवून देण्यात आला.

बलभीम कुबडे म्हणाले की, सेवानिवृत्त कामगारांचे न्याय–हक्क मिळवून देण्याचे कार्य संघटना सातत्याने करत आहे. मात्र संघर्षाशिवाय हक्क पदरात पडत नाहीत. २५ वर्षे विना अपघात सेवा देऊनही सन्मानासाठी संघर्ष करावा लागतो, हे मोठे दुर्दैव आहे. कामगारांच्या पेन्शन, थकीत देयके व करार विषयक मागण्यांसाठी आम्हाला पुढे आंदोलन उभारावे लागणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. सेवानिवृत्त झालेल्या चालकांचा सन्मान होण्यासाठी संघटनेचे अर्जुनराव बकरे, गोरख बेळगे, गंगाधर कोतकर यांचे सहकार्य लाभले. सत्कारमुर्तीनी हक्काचा सन्मान मिळवून दिल्याबद्दल संघटनेचे आभार मानले.

# आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेचा ३० ऑगस्टला शुभारंभ

## चार मजली सुसज्ज इमारतीतून अत्याधुनिक नेत्रोपचार सुविधा




नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालयाच्या आरोग्य सेवेचा विस्तार करण्यात आला आहे. नेत्रालयाची दुसरी शाखा तारकपूर परिसरात गंगा उद्यान रोडवर ३० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन होणार आहे. यानंतर सकाळी ९.४५ वाजता धार्मिक परीक्षा बोर्ड येथे गुरुभगवंतांच्या आशीर्वादाने लोकार्पण सोहळा होईल. सावेडीकरांना अगदी नजीक अत्याधुनिक नेत्रोपचार सुविधा उपलब्ध होत आहे.

५००० स्क्वेअर फूटाच्या चार मजली प्रशस्त वास्तूत नेत्रालय खुले होत असून याठिकाणी अद्ययावत तपासणी सुविधांसह आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार मॉड्युलर ऑपरेशन थिएटरही असणार आहे. रुग्णांना दर्जेदार आणि परिपूर्ण उपचार मिळावेत यासाठी हा आरोग्य सेवा विस्तार करण्यात आला आहे. शिवाय याच ठिकाणी आनंदऋषीजी हॉस्पिटलची सुपरस्पेशालिटी ओपीडीही कार्यरत असणार आहे, अशी माहिती प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड यांनी दिली.

आनंदऋषीजी नेत्रालयाने सर्वोत्कृष्ट नेत्रोपचार सेवा देत नगरसह राज्यातील नेत्ररूग्णांना दिलासा दिला आहे. महावीर भवन येथील नेत्रालयानंतर आता तारकपूर येथे दुसरी शाखा कार्यान्वित होत आहे. याठिकाणी डायग्नोस्टिक सेंटर, ओसीटी, ए–स्कॅन, ऑटो रिफ्रक्टोमीटर, रोनोमेट्री मशीन असून अनुभवी नेत्ररोग तज्ज्ञांची टिम रूग्णसेवा देणार आहे. लहान मुलांच्या तिरळेपणासह डोळ्यांच्या विविध समस्यांवर उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. संगणक व मोबाईल वापरामुळे येणाऱ्या नेत्र शुष्कतेवर उपचार केले जातील. नेत्रालयात मधुमेह व रेटिना, क्रॉनिया, काचबिंदू असे स्पेशालिटी क्लिनिक कार्यरत असणार आहेत. फेको पद्धतीने मोतीबिंदू शस्त्रक्रिया, इंडियन व इम्पोर्टेड कंपनीच्या मोनोफोकल व मल्टीफोकल या अत्याधुनिक लेन्सेस येथे उपलब्ध असतील.

सर्व प्रकारच्या कॅशलेस, इन्शुरन्स सुविधा, सर्व प्रकारच्या लॅब टेस्ट, ब्रॅण्डेड ऑप्टिकलज सेंटर, मेडिकल स्टोअर, ब्लॅड कलेक्शन सेंटर येथे असणार आहे. आनंदऋषीजी नेत्रालयात आतापर्यंत एक लाखांहून अधिक यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. १५ अनुभवी नेत्रतज्ज्ञ पूणवेळ रूग्णसेवेसाठी उपलब्ध आहेत. नगरसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये वेळोवेळी नेत्र तपासणी शिबिरे घेण्यात येतात. यातून आतापर्यंत लाखो नेत्ररूग्णांना लाभ झालेला आहे. आता नगरकरांच्या सोयीसाठी तारकपूर येथे दुसरी शाखा सुरु होत असून याचा नेत्ररूग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन मेडिकल डायरेक्टर डॉ. अशोक महाडीक यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ८६८६३०१५१५.

# भजन, भारुड, योगाभ्यास व दीपोत्सवाने श्रीज्ञानेश्वरी सामूहिक पारायण सप्ताह रंगला

## माउलींच्या सप्त शतकोत्तर सुवर्णजयंती निमित्त श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाचे आयोजन



ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाची सांगता उत्साहात व भक्तिपूर्ण वातावरणात करण्यात आली.

नगर – श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्त शतकोत्तर सुवर्णजयंती निमित्त अहिल्यानगर शहरातील श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग सामूहिक चिंतन महाप्रकल्पाच्या वतीने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यासवर्गाचे आचार्य माजी प्राचार्य डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या पारायण सोहळ्यात अभ्यास वर्गातील साधकांनी सहभाग घेत ७ दिवस ग्रंथाचे पारायण केले. अभ्यास्वर्गाचे संचालक डॉ. दिलीप धनेश्वर यांनी कार्यक्रमांचे नियोजन केले.

या ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाची सांगता उत्साहात व भक्तिपूर्ण वातावरणात करण्यात आली. यानिमित्ताने साधकांनी भजन, भारुड, गवळण गात व फुगडी खेळून हा आनंदोत्सव साजरा केला. स्थापन केलेल्या देवतांची विधिवत उत्तरपूजा करून सर्व साधकांचे ज्ञानेश्वरी ग्रंथ एकत्र मांडून दत्ता भालेराव यांनी व साधकांनी विधीवत पूजन केले. यावेळी टाळ चिपळ्यांच्या तालात ज्ञानोबा तुकारामाच्या नामगजरात ग्रंथाला प्रदक्षिणा करून वंदन केले सामुहिक पसायदान व आरती करण्यात आली. अभ्यासवर्गाचे आचार्य प्राचार्य डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांचा सपत्नीक विशेष सन्मान साधकांनी केला.

या कार्यक्रमात अभ्यास्वर्गाचे साधक प्रा.सुदाम देवखिळे यांनी ज्ञानेश्वरीतील कुंडलिनी जागृतीच्या संदर्भातील अध्याय योगासनाच्या प्रात्यक्षिकासह सादर केला. धनश्री आपटे यांनी गीता ज्ञानामृताचा मराठीत अर्थ समजावून सांगितला. या सोहळ्याची सांगता दीपोत्सवाने करण्यात आली. ज्ञानेश्वरीतील दिव्यांच्या संदर्भातील ओव्यांचे सुचित्रा भालेराव यांनी वाचून दिवे प्रज्वालीत करून दिव्यांचा झगमगाटात हा दीपोत्सव साजरा करण्यात आला. सप्ताहाचे संयोजक संजय खेळे व सहसंयोजक ऋता ठाकूर यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. भक्तीने भारावलेल्या वातावरणात महाआरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सोहळ्याचे यजमान प्रा.सुदाम देवखिळे व दादासाहेब वडवकर होते. ज्ञानेश्वर महापुरुष, आदिनाथ जोशी यांनी पूजेचे पौरोहित्य केले. ज्ञानेश्वर दुधाडे यांच्या भजनी मंडळाने भजनाची सेवा दिली. सप्ताह दरम्यान नाशिक विभागाच्या आयुक्त स्वाती काळे व सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी भेट दिली.

# अव्यावसायिक वाहनांसाठी वार्षिक पास सवलत सुरु

नगर – अव्यावसायिक कार, जीप व व्हॅन वाहनांसाठी १५ ऑगस्ट पासून वार्षिक टोल (फास्टॅग) पास सेवा सुरु झाली आहे. हा पास राजमार्ग मोबाईल ॲप किंवा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावरून मिळवता येईल, असे पुणे येथील प्रकल्प संचालक एस.एस. कदम यांनी कळविले.

वार्षिक टोल पासची किंमत ३ हजार रुपये असून त्याची वैधता एक वर्ष किंवा २०० एकेरी फेऱ्या, यापैकी जे आधी पूर्ण होईल तेवढीच राहील. हा पास केवळ राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती महामार्गांवरील टोल प्लाझांसाठी वैध असेल. अहिल्यानगर जिल्ह्यातील हिवरगाव पावसा टोल प्लाझावरही तो लागू राहील. अधिक माहितीसाठी १०३३ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री– पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान
कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर–पुणे रोड, अहिल्यानगर
संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.i

## टेंडर नोटीस

**दि अहमदनगर फटाका व्यापारी असो. अहमदनगर**

नगर–कल्याण रोड, जाधव मळा, नालेगाव वेथील फटाका मार्केटमध्ये खालील प्रमाणे टेंडर काढणे आहे. तरी इच्छूक व्यक्तींनी सदर पत्त्यावर टेंडर दि. ०५/०९/२०२५ पर्यंत पोहच करावा.

पत्ता : अरविंद फोटो स्टुडिओ, अग्निशामक दलाशेजारी, जुनी महानगरपालिका शेजारी, अहमदनगर वेळ –११ ते ३

१) पत्रा पार्टीशन टाकणे व ३ कमानी सह
२) साफ सफाई कामगार
३) फटाका मार्केटमध्ये दुकानाकरीता व मैदानामध्ये लाईट व्यवस्था जनरेटरसह
४) फटाका दुकानचे इन्शुरन्स करणेबाबत
५) अग्निशमन सिलेंडर व्यवस्था करणे बाबत
६) सिक्युरिटी एजन्सी २० दिवसाकरिता नेमणे

टिप; मंजूर व ना मंजूर करणे हा अधिकार फटाका असो.कडे राहील.

**दि.अहमदनगर फटाका व्यापारी असो.अहमदनगर**

श्री.श्रीनिवास बोज्जा (सेक्रेटरी) मो. ७८७५५०२०००
श्री.गणेश परभणे (अध्यक्ष) मो. ८६६८७६८५७६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी खूप मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. **ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २७/०८/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे सावेडी येथील आनंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अहमदनगर** मधील खालील वर्णनाची प्लॉटसह बांधकाम असलेली मिळकत– **सर्व्हे नं. ९५ मधील प्लॉट नं. ११ चे एकूण क्षेत्रफळ ६२१.०० चौ.मी. यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचा पश्चिम बाजूचा प्लॉट ३१०.५ चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट. यांसी चतुःसिमा :–**

पुर्वेस :– प्लॉट नं.११ पैकी सुहास पांडुरंग जरे यांच्या मालकीचा प्लॉट
दक्षिणेस :– प्लॉट नं.१० पश्चिमेस :– लागू सर्व्हे नंबर
उत्तरेस :– गुलमोहर रोड

**वर नमूद मिळकतीचे विद्यमान मालक – संतोष पांडुरंग जरे**
रा. आनंद नगर, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली मिळकत विद्यमान मालक **विजय माणकचंद भंडारी रा.आनंदऋषी हॉस्पिटल जवळ,माणिक नगर,अहमदनगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्यांचे ठरविले असून विसाराची रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध,ताबा, मनाई, दावा,लिज,गहाण, दान, बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहिल्यानगर (अहमदनगर) पो.तु.ता. नगर पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील मौजे **कॅम्पनगर** येथील मे.दु.निबंधक साहेब, अहिल्यानगर (अहमदनगर) यांचे कक्षेतील कराचीवालानगर भागातील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे. **जि.एल.आर. सर्व्हे नं. ८–जे मधील विद्यमान मालक यांचे मालकीचे प्लॉट नं.१५ चे क्षेत्र २२८.०० चौ.मी. प्लॉट मिळकती बाबत. यांसी चतुःसिमा :–**

पूर्वेस : रस्ता
दक्षिणेस : लागु सर्व्हे नंबर
पश्चिमेस : प्लॉट नं.२६
उत्तरेस : प्लॉट नं. १६
येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.
दि.२७/०८/२०२५
अहमदनगर.

**ॲडव्होकेट**
**नाजीम अहमद इस्माईल शेख**
**कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टरी ऑफिसशेजारी, डावरेगल्ली, अहमदनगर–४१४००१,
मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी खुप मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसांचे आत** खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. **ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २७/०८/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी कॅम्पनगर मधील इंडियन इनफन्ट्री लाईन्स (कोटला रोड) येथील जी.एल.आर. सर्व्हे नं. १८, बंगला नं. २० चे एकुण क्षेत्रफळ ०.५१ एकर त्याचे २०६३.८६ चौ.मीटर यापैकी पूर्व बाजुकडील दक्षिण बाजूने पूर्व – पश्चिम ९० फुट रुंदी असलेली एकुण ९०००.०० चौ.फुट याचे ८३६.४३ चौ.मीटर खुली जागा. यांसी चतुःसिमा :–**

पुर्वेस :– जी.एल.आर.सर्व्हे नं. १९ दक्षिणेस :–रस्ता
पश्चिमेस :– जी.एल.आर.सर्व्हे नं. १८ पैकी उर्वरीत क्षेत्र
उत्तरेस :– जी.एल.आर. सर्व्हे नं. ८

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**
**१. अल्लाबक्ष कादरभाई शेख**
**२. हारुन अल्लाबक्ष शेख**
दोघेही रा. टाकळी खातगांव, ता.जि. अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

# उंच कुटुंबाची वार्षिक कमाई ८२ कोटी रुपये!

मुलांची उंची त्यांच्या आई-वडीलांच्या उंचीवर अवलंबून असते; परंतु काही प्रकरणात मुलांची उंची आई-वडीलांपेक्षा जास्त उंच असते; परंतु अमेरिकेतील एका कुटुंबातील सर्वांची उंची अगदी ताडामाडासारखी आहे. या कुटुंबातील सर्वच लोक सहा फुटांपेक्षा जास्त उंच आहेत. यामुळे या कुटुंबाला सहा फुटी परिवार असे म्हटले जाते. हे लोक दरवर्षी ८२ कोटी रुपये कमावतात. यांच्या कमाईची पद्धतही आश्चर्यकारक आहे.

अमेरिकेच्या फ्लोरिडा येथे राहणारे टेमारा कुटुंब अलिकडे 'सोशल मीडिया'वर 'सर्वात उंच कुटुंब' म्हणून गाजत आहे. या कुटुंबातील सदस्यांची उंची ६ फूट ३ इंचापासून ते ६ फूट १० इंचापर्यंत आहे. हेच त्यांच्या प्रसिद्धीचे आणि कमाईचे साधन बनले आहे. या कुटुंबातील सर्वात चर्चित व्यक्ती ६ फूट २ इंच उंचीची मारी टेमारा आहे. तिचे इंस्टाग्रामवर ३० लाखाहून अधिक फॉलोअर्स आहेत आणि वार्षिक सुमारे १० मिलियन डॉलर (सुमारे ८२ कोटी) कमाई आहे; परंतु मारी कुटुंबातील सर्वात उंच नाही, तर तिचा मोठा भाऊ ट्रॉयची उंची ६ फूट १० इंच आहे. शेनची उंची ६ फूट ९ इंच आहे. दोन्ही बास्केटबॉल खेळाडू राहिले आहेत आणि कमाईमध्ये एकमेकांचे प्रतिस्पर्धी आहेत. ट्रॉय वर्षाला एक लाख डॉलर तर शेन ५० हजार डॉलर कमावत आहे.




मारी हीची आई क्रिस्टीन (६३ वर्ष, उंची ६ फूट ५ इंच) ही आधी इमर्जन्सी ऑपरेटर म्हणून काम करायची. आता पुरुषांच्या बुटांचे (युके साईज १३) फोटो विकून चांगली कमाई करते. मारीचे वडील मायकल (६५ वर्ष, उंची ६ फूट ३ इंच) आधी इलेक्ट्रीशियन होते. आता कुटुंबाच्या कंटेंट प्रोजेक्टमध्ये सहभागी होऊन वर्षाला ५० हजार डॉलर कमावत आहेत. मारी म्हणते की त्यांचे बालपण आर्थिकदृष्ट्या खडतर होते. आई-वडीलांनी नेहमीच मुलांच्या गरजांना प्राधान्य दिले; परंतु स्वत:साठी कधी जास्त पैसे खर्च केले नाही. त्यामुळे त्यांना आता आर्थिकदृष्ट्या सुरक्षित कुटुंबाला पाहून सर्वाधिक आनंद वाटतो आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी मारीने तिची एक लाख डॉलर वार्षिक पगाराची नोकरी सोडून 'ओन्ली फॅन्स' वर काम सुरू केले. सुरुवातीला ती एकटी व्हिडीओ तयार करायची; परंतु आई-वडील आणि भाऊ नेहमीच बॅकग्राऊंडला दिसायचे किंवा मदत करायचे.

हळूहळू मारीने त्यांनाही छोट्या-छोट्या स्किट्समध्ये सामील करणे सुरू केले. सर्वांनी त्यासाठी विनातक्रार तयारी दाखवली. आईला हे मजेदार वाटले तर वडीलांना हसू आले. भावांनी आव्हान म्हणून हे स्वीकारले. पहिल्या व्हिडीओत कुटुंबाने आपल्या उंचीची तुलना करत सर्वात उंच ते सर्वात छोटे असे ओळीने उभे राहत पोझ दिली. त्यांची उंची जास्त असल्याने सर्वसाधारण फर्निचर त्यांना कसे पुरेसे पुरत नाही असे दाखवले. आता हे कुटुंब 'टॉल फॅमिली ऑनलाईन' नावाने प्रसिद्ध आहेत. उंचावर ठेवलेली एखादी वस्तू सहज काढणे, दरवाजाच्या चौकटीला धडकणे, छोट्या कारमध्ये बसताना येणारी अडचण, या शिवाय डान्स, प्रॅंक्स आणि रोजचे अनुभव त्यांच्याद्वारे मजेदार अंदाजात सादर केले जातात.

## कॅलिडोस्कोप



# तो बनला ८०० मुलांचा पिता

१०० वर्षांच्या दिएगोने आपल्या नामशेष होणाऱ्या प्रजातीला वाचवलं आहे. दिएगो एक, दोन नाही तर तब्बल ८०० मुलांचा पिता आहे. आता हा दिएगो माणूस नाही तर कासव आहे. या कासवाचं वजन ८० किलो आहे. १०० वर्षांचा दिएगो हे 'चेलोनोएडिस हूडेनसिस' नामक प्रजातीचं कासव आहे. ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर होती. जवळपास ५० वर्षांपूर्वी या प्रजातीची दोन नर तर १२ मादी कासवं उरली होती. त्यामुळे काही दिवसातच या प्रजातीचं अस्तित्व संपेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. ही कासवं गालापोगास बेटांवरच्या भल्या मोठ्या परिसरात रहात होती. त्यामुळे त्यांची संख्या वाढत नव्हती. म्हणूनच दिएगो आणि इतर कासवांना १९६५ मध्ये कॅप्टिव्ह ब्रिडग कार्यक्रमाअंतर्गत दक्षिण कॅलिफोर्नियातल्या सांताक्रूज आयलंड प्राणी संग्रहालयात आणण्यात आलं होतं. दिएगोला बारा मादी कासवांसोबत ठेवण्यात आलं होतं. या काळात या कासवांची संख्या २००० झाली. यात दिएगोने प्रमुख भूमिका बजावली. दिएगो यापैकी ८०० पिलांचा पिता बनला. दिएगो जवळपास पाच दशकं आपल्या प्रजातीची लोकसंख्या वाढवण्यासाठी झटला. त्यानंतर तो निवृत्त झाला आणि त्याची रवानगी पुन्हा पॅसिफिक महासागरातल्या गालापोगास बेटांवर करण्यात आली.

# 'चॅटजीपीटी'चा सल्ला पडला महाग





'सोशल मीडिया' आणि वाढत्या टेक्नॉलॉजीमुळे आजकाल लोकांकडून त्याचा वापर, त्यावर अवलंबून राहणे वाढले आहे. 'चॅटजीपीटी' आल्यापासून तर अनेकजण सर्रास त्याचा वापर करत असतात; मात्र त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवून काहीही अवलंबणे जीवासाठी धोकादायक ठरू शकते. याचे एक ज्वलंत, जितेजागते उदाहरण समोर आले असून 'चॅटजीपीटी'चा सल्ला ऐकणे एका माणसाला इतके महागात पडले, की त्याची रवानगी थेट हॉस्पिटलमध्येच झाली.

खरे तर, 'चॅटजीपीटी'ने सुचवलेल्या डाएट प्लॅनचे पालन केल्यानंतर एका तरुणाला रुग्णालयात दाखल करावे लागले. डॉक्टरांचे म्हणणे आहे, की आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) शी संबंधित ब्रोमाइड विषबाधेची ही कदाचित पहिलीच घटना आहे. वॉशिंग्टन विद्यापीठातील डॉक्टरांनी 'नल्स ऑफ इंटरनल मेडिसिन: क्लिनिकल केसेस'मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार एका माणसाने त्याच्या आहारातून मीठ (सोडियम क्लोराईड) कमी करण्यासाठी 'चॅटजीपीटी'चा सल्ला घेतला. त्यानंतर 'चॅटजीपीटी' ने त्याला क्लोराईडऐवजी सोडियम ब्रोमाइड घेण्याचा सल्ला दिल्याचा आरोप आहे. त्या माणसाने तीन महिने हा सल्ला पाळला, पण त्यादरम्यान त्याची प्रकृती बिघडू लागली. त्याला पॅरानोईया आणि मतिभ्रम यासारख्या व्याधींची गंभीर लक्षणे जाणवू लागली आणि अखेर रुग्णालयात दाखल करावे लागले.

अखेर रुग्णालयात दाखल केल्यानंतर, जेव्हा त्याला रुग्णाला विचारण्यात आले, तेव्हा त्याने सांगितले, की त्याच्या आजाराचे कारण चॅटजीपीटी आहे, तेव्हा डॉक्टरांनी स्वतः 'चॅट जीपीटी'ला तोच प्रश्न विचारला आणि 'एआय'ने पुन्हा ब्रोमाइड हा पर्याय सुचवला, परंतु ते मानवी वापरासाठी असुरक्षित आहे हे काही त्याने स्पष्ट केले नाही. यावरून असे दिसून येते की एआय संदर्भ न समजता माहिती देऊ शकते, जे अत्यंत धोकादायक आहे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे; मात्र सुदैवाने तीन आठवड्यांच्या उपचारानंतर ती व्यक्ती पूर्णपणे बरी झाली. या घटनेनंतर, डॉक्टरांनी एक गंभीर इशारा दिला आहे. 'एआय टूल्स' वैज्ञानिक माहिती अधिक सुलभ करू शकतात; परंतु ते कोणत्याही परिस्थितीत व्यावसायिक वैद्यकीय सल्ल्याची जागा घेऊ शकत नाहीत. आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये नेहमीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, कारण 'एआय' कधी कधी चुकीचे मार्गदर्शन देऊ शकते; जे घातक ठरू शकते, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

# कुठून आलं सोनं?

सोन्यासारख्या चमचमत्या धातूचं आकर्षण नसणारी व्यक्ती विरळाच! सोन्याचे दागिने, नाणी, विटा यांना प्रचंड मागणी असते. भारतात प्रचंड पैसा ओतून सोन्याची खरेदी केली जाते. इतर देशांमध्येही सोन्याची खरेदी होते. असा हा धातू कुठून आला, याच्या निर्मितीचं रहस्य काय, असे प्रश्न काहीजणांना पडतात. सोन्याची उत्पत्ती कशी झाली,



याबाबत बरेच तर्क लढवले जातात. पण सोनं अंतराळातून पृथ्वीवर आल्याचं काही संशोधकांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या पोटात दडलेलं सोनं अंतराळातून उल्कांच्या रूपात पृथ्वीवर आल्याचं संशोधक सांगतात. अर्थात याबाबतही मतंमतांतरं आहेत. पण शास्त्रज्ञांकडे याचे ठोस पुरावे असल्याचं म्हटलं जातं. सोनं अंतराळातून उल्कापडांच्या रुपात पृथ्वीवर आलं, असं जॉन एमस्ली या शास्त्रज्ञाचं म्हणणं आहे. सोनं अंतराळातून आल्याबाबत विविध तर्क लढवले जातात. १९७० मध्ये अपोलो यान चंद्रावर उतरलं. त्यानंतर अंतराळातून पृथ्वीवर झालेल्या उल्कावर्षावामुळे सोन्याची उत्पत्ती झाल्याचा दावा केला जाऊ लागला. याबाबत बरंच संशोधन करण्यात आलं आहे. त्यामुळे पृथ्वीवरचं सोनं ही अंतराळाची देणगी असल्याची बाब नाकारता येण्यासारखी नाही.

# प्रेयसीसाठी चोरला चंद्रावरचा दगड!

प्रेयसीसाठी चंद्र-तारे तोडून आणण्याचे आश्वासन प्रियकर आपल्या प्रेयसीला देत असतात. एका माणसाने हे वाक्य खरे करून दाखवले. त्याने त्याच्या प्रेयसीसाठी चक्क 'लूनर रॉक' म्हणजेच चंद्रावरचा दगड चोरून आणला, तोही 'नासा'च्या लॅबमध्ये घुसून. विशेष म्हणजे त्याने चोरलेल्या या लूनर रॉकची किमत २१ लाख डॉलर इतकी होती.

नासातून चंद्रावरील दगड चोरणाऱ्या माणसाचे नाव रॉबर्ट थॅड आहे. रॉबर्टने सांगितले, की तो नासामध्ये काम करणाऱ्या टिफनीवर प्रेम करत होता. रॉबर्ट तिच्या खूप प्रेमात होता, त्याला त्याच्या प्रेयसीसोबतचे नाते अधिक रोमँटिक बनवण्याची कल्पना सुचली आणि ती होती चंद्रावरील प्रणय. यासाठी त्याने एक योजना आखली.

रॉबर्टने नासाच्या प्रयोगशाळेत ठेवलेला चंद्राचा एक खडक चोरला. त्याने त्याची मैत्रीण टिफनी फाउलरलाही याबद्दल सांगितले. दोघांनी मिळून चंद्राचा तुकडा चोरण्याची योजना आखली.

अखेर चंद्रावरचा खडक चोरल्यानंतर रॉबर्टने घरी आणला आणि आपल्या बेडमध्ये लपवून ठेवला. नंतर त्याच बेडवर त्याने फाउलरसोबत प्रणय केला.



रॉबर्ट म्हणतो, की यापेक्षा चांगले काहीही असू शकत नव्हते. कारण तो चंद्रावर रोमान्स करण्यासारखाच अनुभव होता असेही त्याने सांगितले. माजी नासा इंटर्न रॉबर्ट थॅड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चंद्रावरचा खडक चोरण्यासाठी सुरक्षा कॅमेरे पुन्हा डिझाइन केले. त्यांनी निओप्रीन बॉडीसूट घातले आणि प्रयोगशाळेत प्रवेश मिळवण्यासाठी अधिकृत बॅजदेखील बनवले. या सर्व गोष्टींच्या मदतीने रॉबर्ट, फाउलर आणि त्यांच्या एका मित्राला १७ पौंड वजनाचा चंद्राचा दगड चोरण्यात यश आले.

'एफबीआय'च्या सांगण्यानुसार, मात्र त्या खरेदीदाराला त्या लूनर रॉकच्या स्रोताबद्दल संशय येताच त्याने एजन्सीला माहिती दिली. त्यानंतर 'एफबीआय'ने रॉबर्ट आणि त्याच्या साथीदारांना पकडण्यासाठी गुप्त कारवाई केली. अखेर रॉबर्टने आपला गुन्हा कबूल केला. या चोरीसाठी, गुन्ह्यासाठी त्याला आठ वर्षांची शिक्षा झाली, मात्र नंतर त्याला दोन वर्ष आधीच सोडून देण्यात आले तर फाऊल हिला दीडशे तासांच्या सामुदायिक सेवेची आणि नऊ हजार डॉलर्सच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

# प्लास्टिकचा असाही वापर



लाकडापासून विविध वस्तू तयार केल्या जातात. लाकडं मिळवण्यासाठी झाडांची कत्तल केली जाते. एकीकडे झाडं तोडली जात असताना पर्यावरणाला हानीकारक अशा प्लास्टिकचा वापर वाढत आहे. म्हणूनच कॅनडातल्या एका कंपनीने प्लास्टिकचा पुनर्वापर करून लाकडाला पर्यायी वस्तूची निर्मिती केली आहे. 'गुडवूड' असं या कंपनीचं नाव आहे. या वस्तूचा वापर इमारत बांधण्यासाठी केला जात आहे. यात खिळेही ठोकता येतात. लाकडाऐवजी या वस्तूचा वापर केला जाऊ शकतो. ही कंपनी कॅनडामधल्या नोवा स्कॉटिया प्रांतातल्या हॉलीफ्लॅक्स परिसरातल्या जवळपास ८० टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर करते तर उर्वरित २० टक्के प्लास्टिक इतर कंपन्यांकडे पाठवलं जातं. यामुळे प्लास्टिकचं प्रमाण कमी होतं शिवाय लाकडाला पर्याय उपलब्ध झाल्यामुळे झाडं तोडली जात नाहीत. 'गुडवूड'च्या या शोधामुळे स्थानिकांसह इथलं प्रशासनही आनंदी आहे. प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणं शक्य नाही. म्हणूनच प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याचा पर्याय योग्य असल्याचं कंपनीचं म्हणणं आहे.

# असेही निकष देखणेपणाचे!

जगात सौंदर्याचे निकष प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहेत. एकीकडे सडपातळ शरीर आणि सिक्स-पॅक ॲब्सला सौंदर्याचे प्रतीक मानले जाते, तर दुसरीकडे इथियोपियातील बोडी जमातीमध्ये सुटलेले पोट आणि स्थूल शरीरच पुरुषांना सर्वात देखणे बनवते. बोडी जमातीमध्ये बाहेर निघालेले पोट आणि फुगलेले गाल केवळ पुरुषांना आकर्षक बनवत नाहीत, तर त्यांना लग्नासाठी सर्वात योग्य उमेदवारही बनवतात.

इथियोपियाच्या ओमो खोऱ्यात राहणारी बोडी जमात, जी मीन नावानेही ओळखली जाते, तिच्या अनोख्या सांस्कृतिक परंपरांसाठी प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी जूनमध्ये काएल समारंभ आयोजित केला जातो, जो जमातीचा नववर्ष उत्सव आहे. या समारंभाचे मुख्य आकर्षण आहे पुरुषांमधील सर्वात स्थूल होण्याची स्पर्धा. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक कुटुंब आपल्या घरातील अविवाहित पुरुषाची निवड करते. हा पुरुष पुढील सहा महिने विशेष आहार आणि जीवनशैलीचे पालन करतो. या काळात ते गायीचे रक्त आणि दूध यांचे मिश्रण सेवन करतात, ज्यामुळे त्यांचे वजन झपाट्याने वाढते.

या अनोख्या प्रक्रियेत पुरुषांना वेगळ्या झोपडीत सहा महिने रहावे लागते. या काळात त्यांना कोणतीही शारीरिक हालचाल करण्याची किंवा लैंगिक संबंध ठेवण्याची परवानगी नसते. महिला आणि मुली त्यांच्यासाठी गायीचे ताजे रक्त आणि दूध आणतात. बोडी जमातीमध्ये गाय पवित्र मानली जाते. त्यामुळे अनोख्या पद्धतीने रक्त काढण्यात येते. नंतर मातीने ते बंद केले जाते; जेणेकरून गायीचा जीव वाचेल. हा आहार सेवन करणे सोपे नाही. उष्ण हवामानामुळे रक्त लवकर गोठते आणि स्पर्धकांना सकाळी-सकाळी दोन लिटर रक्त आणि दूधाचे मिश्रण त्वरित प्यावे लागते. अनेक पुरुष इतक्या प्रमाणात आहार पचवू शकत नाहीत आणि उलटी करतात. तरीही, जे या आव्हानाला पार करतात, ते काएल समारंभाच्या दिवशी आपले स्थूल शरीर प्रदर्शित करतात. या दिवशी पुरुष आपल्या शरीरावर माती आणि राख लावतात आणि शहामृगाच्या पंखांपासून बनवलेले दागिने घालतात. नंतर ते एका पवित्र झाडाभोवती तासनतास प्रदक्षिणा घालतात, जिथे जमातीचे इतर लोक आणि महिला त्यांचा उत्साह वाढवतात.

या स्पर्धेचा विजेता तो पुरुष ठरतो, ज्याचे पोट सर्वात मोठे असते. त्याला कोणतेही भौतिक बक्षीस मिळत नाही; पण तो आयुष्यभरासाठी जमातीचा नायक बनतो. बोडी जमातीच्या महिला मोठ्या पोटाच्या पुरुषांना अत्यंत आकर्षक मानतात आणि अशी समजूत आहे की त्या या पुरुषांशी लग्न करण्यासाठी उत्सुक असतात. समारंभानंतर, पुरुष सामान्य आहाराकडे परत येतात आणि काही आठवड्यांतच त्यांचे वाढलेले वजन कमी होते; पण त्यांची नायकाची प्रतिमा आयुष्यभर कायम राहते. बोडी जमातीमध्ये प्रत्येक मुलाचे स्वप्न असते की मोठे होऊन या स्पर्धेत सहभागी व्हावे आणि नायक बनावे.



# आनंदीबाजार येथील तोडफोडीच्या घटनेची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करा

## खासदार नीलेश लंके यांनी घेतली पोलिस अधिक्षकांची भेट, उत्सव काळात विशेष सुरक्षा देण्याचीही मागणी

नगर – आनंदीबाजार परिसरातील सय्यद घोडेपीर दर्ग्याच्या चौथऱ्यावर काही दंगेखोरांनी केलेल्या तोडफोडीमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामाजिक सलोखा व बंधुत्वाला धक्का देणारी ही घटना असल्याचे नमुद करत खासदार नीलेश लंके यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निष्पक्ष चौकशी व दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.


आनंदी बाजार येथील प्रकरण तसेच आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

या घटनेच्या पार्श्वभुमीवर खासदार नीलेश लंके यांनी पोलीस अधिक्षकांची भेट घेत निवेदन सादर केले. त्यांच्या समवेत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, माजी महापौर अभिषेक कळमकर, नगरसेवक योगीराज गाडे, अथर खान, प्रा.सीताराम काकडे, नलिनी गायकवाड यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

खा. लंके यांनी निवेदनात नमुद केले आहे की, सुमारे शेकडो वर्षापासून अस्तित्वात असलेले सय्यद घोडेपीर दर्गा हे धार्मिक स्थळ हे दोनही समाजांचे सामूहिक श्रध्दास्थान आहे. या ठिकाणी झालेल्या तोडफोडीला शहरातील समाज घटकांनी दुर्दैवी म्हटले असून ही कृती काहीअसामाजिक प्रवृत्तींचा सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने काही संशयितांना ताब्यात घेले आहे, मात्र चौकशी वेगाने करून त्यांच्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी स्पष्ट केले.

अलिकडेच राहुरी शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना झाली असून अद्याप आरोपी पोलिसांच्या ताब्यात न आल्याने अस्वस्थता वाढल्याचे लंके यांनी निवेदनात नमूद केले आहे. अशा सलग घटनांमुळे कायदा–सुव्यवस्था धोक्यात येत असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

या निवेदनात खा. लंके यांनी विविध मागण्या केल्या आहेत. आनंदीबाजार येथील प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करावी, राहुरीतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा विटंबना प्रकरणातील चौकशीला गती देऊन आरोपींना अटक करावी, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कायद्याच्या चौकटीत ठोस उपाययोजना कराव्यात, संवेदनशील भागांमध्ये पर्याप्त पोलीस बंदोबस्त ठेवून अफवांना आळा घालावा, दोन्ही समाजांत सलोखा टिकवण्यासाठी पोलिसांनी प्रतिनिधींशी संवाद व बैठकांचे आयोजन करावे.

गणेशोत्सव व नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाढत्या तणावाला नियंत्रणात आणणे आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी अधोरेखित केले. खा. लंके यांनी नमूद केले आहे की, आनंदीबाजार, चितळे रोड, तेलीखूंट, मुकुंदनगरसह संवेदनशील भागांमध्ये युध्दपातळीवर पोलीस बंदोबस्त तैनात करावा, उत्सव काळात सार्वजनिक ठिकाणांवर सतत गस्त घालावी, महिला, लहान मुले व वृध्दांच्या सुरक्षेसाठी विशेष गस्त पथके व महिला पोलीस उपस्थिती वाढवावी, अफवांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सोशल मीडिया मॉनिटरिंग प्रभावीपणे राबवावे, दोन्ही समाजाच्या प्रतिनिधींशी सतत संवाद साधून गैरसमज व अफवांना आळा घालावा अशी मागणी करण्यात आली आहे.

**शांततेचे आवाहन...** अहिल्यानगर जिल्हा हा शांततेचा व बंधुत्वाचा आदर्श आहे. काही असामाजिक प्रवृत्ती वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत असल्या तरी नागरिकांनी संयम राखावा. अफवांना बळी पडू नये आणि कायद्यावर विश्वास ठेवावा. दोषींवर निश्चित कठोर कारवाई होईल, असे खा. लंके यांनी आश्वासन दिले आहे.


महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही ऐतिहासिक दर्ग्यावर कारवाई करू नये, अशी मागणीचे निवेदन मुस्लिम समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देण्यात आले.

# राजकीय दबावाखाली कारवाई करू नये अन्यथा न्यायालयात जाण्याचा इशारा

नगर – शहरातील पटवर्धन चौक येथील घोडे पीर दर्गा काही समाजकंटकांनी पाडल्याच्या घटनेचा मुस्लिम समाजाने निषेध व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही ऐतिहासिक दर्ग्यावर कारवाई करू नये, अशी मागणी मुस्लिम समाजाने केली आहे.

याबाबतचे निवेदन मनपा आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक, जुबेर बाबामिया सय्यद, अरबाज शेख, परवेज शेख, वामिस शेख, हाजी एजाज, फारुख शेख, रऊफ पेंटर, फारुख फरशी, आतिफ मेडिकलवाला, सय्यद शफी बाबा उपस्थित होते.

अहिल्यानगर शहराची स्थापना पाचशे वर्षांपूर्वी झाली असून येथे अनेक प्राचीन दर्गे आहेत. या दर्ग्यांचा उल्लेख शासकीय रेकॉर्ड बुक व गॅजेटमध्ये आढळतो, तसेच काही दर्ग्यांना दानरूपाने जमिनी मिळाल्याची नोंद वक्फ बोर्डाकडे उपलब्ध आहे.

निवेदनात असा आरोप करण्यात आला आहे की, काही राजकीय व्यक्ती दबाव टाकून प्रशासनाकडून दर्ग्यांवर कारवाई करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रशासनाने कोणत्याही परिस्थितीत राजकीय दबावाला बळी न पडता निष्पक्षपणे निर्णय घ्यावा, अशी समाजाची मागणी आहे. तसेच, कोणत्याही दर्ग्यावर कारवाई करायची असल्यास त्या दर्ग्याच्या विश्वस्तांना किंवा स्थानिक प्रतिनिधींना पूर्वसूचना देणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. शेख मुदस्सर यांनी इशारा दिला की, जर मनपा प्रशासनाने राजकीय दबावाखाली कारवाई केली, तर मुस्लिम समाज न्यायालयात जाऊन मोठे आंदोलन उभारेल.


घोडेपीर दर्गा प्रकरणात जेसीबी मालक अरुण खरात यांचे नाव गुन्ह्यातून वगळण्याची मागणी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे करण्यात आली.

# 'त्या' प्रकरणातील गुन्ह्यातून जेसीबी मालकाचे नाव वगळण्याची मागणी

नगर – शहरातील पटवर्धन चौक येथे असलेला घोडेपीर दर्गा २४ ऑगस्ट रोजी पाडण्याची घटना घडली. या घटनेतील दोषींना पोलिसांनी पकडले असले तरी सदर प्रकरणात जेसीबी मालक अरुण खरात यांचे नाव अन्यायकारकपणे गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अरुण खरात यांचा या घटनेशी कोणताही थेट अथवा अप्रत्यक्ष संबंध नाही. त्यांची जेसीबी गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्या चालकांच्या ताब्यात असून, २४ ऑगस्ट रोजी घडलेला प्रकार हा केवळ चालकांच्या मार्फत घडून आलेला आहे. खरात यांना या संदर्भात काहीही माहिती नव्हती, मात्र ते जेसीबीचे मालक व बौद्ध समाजाचे असल्यामुळे त्यांना अन्यायाने गुन्ह्यात ओढण्यात आले असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अरुण खरात यांचे नाव गुन्ह्यातून वगळण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी निवेदन देताना सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, संजय जगताप, अंकुश मोहिते, सिद्धार्थ आढाव, भीमराव पगारे, मयूर बांगरे, सुनील भिंगारदिवे, प्रशांत हातरूंकर, समीर भिंगारदिवे उपस्थित होते.

# संग्राम भंडारे महाराजवर तातडीने कायदेशीर कारवाईची मागणी

## शिष्टमंडळाचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन, भंडारे महाराज सतत भडकाऊ व भावनांशी खेळ करणारी विधाने करत असल्याचा आरोप

नगर – जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री यांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी संग्राम भंडारे महाराज यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले. संग्राम भंडारे महाराज हे सतत समाजात भडकाऊ व भावनांशी खेळ करणारी विधाने करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.


बाळासाहेब थोरात यांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी संग्राम भंडारे महाराज यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले.


२६ ऑगस्ट रोजी शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांची भेट घेऊन सदर निवेदन दिले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत ओगले, युवकजिल्हाध्यक्ष मोसिम शेख, भिंगार अध्यक्ष रिजवान शेख, भगवान पंढरीनाथ, खेडकर, अभिजीत कांबळे, सागर इरमल, शामराव वाघस्कर, अकदस शेख, रियाज शेख, नवाज शेख, अमित लोखंडे, अय्याज शेख, हसन शेख आदी उपस्थित होते.

अलीकडेच भंडारे यांनी बाळासाहेब थोरात यांच्या विरोधात आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल, असे धक्कादायक विधान केले. यामध्ये थोरात यांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, समाजामध्ये अशा प्रकारचे उघड दहशतवादी वक्तव्य करणाऱ्या व खालच्या थराला जाऊन धमक्या देणाऱ्या कीर्तनकारावर कारवाई न झाल्याने चुकीचा संदेश जात आहे. कायद्याच्या चौकटीत राहून त्वरित कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. यामुळे समाजामध्ये पोलीस प्रशासनाकडून चांगला संदेश जावून कोणीही चूकीचे व भडकाऊ वक्तव्य करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

कीर्तनकार संग्राम भंडारे यांनी ज्या पद्धतीमध्ये बाळासाहेब थोरात यांच्या विषयी चुकीच्या विधान केले आहे. त्याला १५ दिवस उलटूनही कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. अशा प्रकारचे व्यक्ती एका ज्येष्ठ नेत्याला खालच्या पातळीवर टीका करुन धमक्या देत असेल, तर पोलीस प्रशासनाने कारवाई करणे आवश्यक आहे, असे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत ओगले म्हणाले.

# ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठा



श्री विशाल गणेश मंदिर येथे जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

नगर – ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते बुधवारी सकाळी 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना विधीवत पार पडली. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडित खरपुडे, सचिव अशोक कानडे, देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, हरीचंद्र गिरमे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा. माणिक विधाते, संजय चाफे, नितिन पुंड आदी उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत म्हणून विशाल गणेशाची ओळख केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक एकतेचे प्रतिक आहे. मंदिरात होत असलेले कार्यक्रम ही भाविकांना एकत्र आणणारी आणि समाजाला सकारात्मक दिशा देणारी पर्वणी आहे. ते पुढे म्हणाले, गणेशोत्सवाच्या काळात शिस्त, सुरक्षा आणि स्वच्छता ही आपली जबाबदारी आहे. भक्तांनी शांततेत आणि आनंदात सण साजरा करावा. पोलिस विभाग नेहमी समाजाच्या सोबत उभा आहे.

अभय आगरकर यांनी यांनी सांगितले कि ग्रामदैवत श्री विशाल गणेश हे अहिल्यानगरकरांचे आस्थेचे केंद्र आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला मिळालेला भाविकांचा प्रतिसाद ही श्रींच्या कृपेची प्रचिती आहे. समाजाच्या सर्व घटकांनी एकत्र येऊन हा सण मोठ्या उत्साहात व एकतेने साजरा करावा, हेच श्रींचे खरे आशीर्वाद मानले जातील. गणेशोत्सवानिमित्त ट्रस्टतर्फे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी रुद्रवंश ढोल पथकाने आपली कला सादर केली. मंदिर परिसरात फुलांच्या सजावटीसोबतच विद्युत रोषणाईने सजवलेली कलाकृती विशेष आकर्षणाचे केंद्र ठरली. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. महिला व युवक मंडळांनी स्वयंसेवक म्हणून व्यवस्था सांभाळली. संपूर्ण परिसरात गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.



### भिंगार येथील मानाच्या श्री देशमुख गणपतीची प्राणप्रतिष्ठा

भिंगार येथील मानाच्या श्री देशमुख गणपतीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी समीर देशमुख, कार्तिक देशमुख, अर्णव देशमुख, प्रज्वल देशमुख, मोरेश्वर मुळे, अवधूत देशपांडे, अनिल मुळे, प्रतीक सूर्यवंशी, अमोल कोरे, अमोल नागपुरे उपस्थित होते. (छाया – बबलू शेख)

# प्रत्येक नागरिकाला आरोग्य सेवा अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण द्या

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश

नगर – जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला शासकीय रुग्णालयांमधून आरोग्य सेवा अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण मिळाव्यात, यासाठी आरोग्य यंत्रणेने सक्षमपणे काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.


जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आरोग्य विभागाच्या विविध योजनांच्या आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिवकुमार वलांडे, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकुमार नेहेरकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अविनाश आहेर, जिल्हा माता–बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद काकडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रवींद्र कानडे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी देवीदास कोकाटे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात मुला–मुलींचे लिंग गुणोत्तर समान ठेवण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर स्थापन केलेल्या ग्रामस्तरीय समितीच्या माध्यमातून मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी असलेल्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित करावे. समितीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून जनमानसांमध्ये व्यापक स्वरूपात जागृती करण्यात यावी. जिल्ह्यातील संशयित क्षयरुग्णांचे लवकर निदान व योग्य उपचार होणे हे क्षयरोग निर्मूलनासाठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी झोपडपट्ट्या, ऊसतोड कामगार वसाहती, औद्योगिक क्षेत्रे अशा ठिकाणी तपासणीची संख्या वाढवावी. सकारात्मक अहवाल आलेल्या रुग्णांवर तातडीने उपचार सुरू करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिले.

डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया अशा आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्र व मोठ्या गावांमध्ये गृहभेटी सातत्याने करण्यात याव्यात. डास निर्मूलनासाठी कीटकनाशक फवारणी, साचलेले पाणी हटवणे व निर्जंतुकीकरण राखण्यावर भर द्यावा. जिल्ह्यातील जन्म व मृत्यूची नोंद वेळेत व्हावी, यासाठी खाजगी दवाखाने, प्रसुतीगृहांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नोंदी घेण्यात नियमित भेटी देऊन संकलन करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीस सर्व आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी तालुका दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# चिचोंडी पाटील उपबाजार समितीचे भूमिपूजन लांबणीवर

## गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यामुळे भूमिपूजनाच्या कार्यक्रमाच्या वेळेत बदल

नगर – नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार समितीचे चिचोंडी पाटील येथे ३० ऑगस्ट रोजी होणारे भूमिपूजन सप्टेंबर महिन्यात होणार असल्याची माहिती आमदार शिवाजीराव कर्डिले व बाजार समिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर ठरणार असल्याच्या दृष्टीने चिचोंडी पाटील येथे उपबाजार समितीची स्थापना करण्याचा निर्णय बाजार समितीच्या वतीने घेण्यात आला होता. उपबाजार समितीचे भूमिपूजन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ३० ऑगस्ट रोजी करण्यात येणार होते. परंतु त्यादरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा मुंबई दौरा असल्याने यावेळी पणनमंत्री जयकुमार रावल व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह बहुतांशी मंत्री शहा यांच्या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत.

अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील महत्त्वांच्या विषयावर चर्चा होणार आहे. तसेच पक्ष संघटना व आगामी निवडणुकींबाबतही चर्चा करण्यात येणार आहे. राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात येणार असल्याने सर्वच नेते शहा यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे चिचोंडी उप बाजार समितीच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. ३० ऑगस्ट रोजी होणारा भूमिपूजनाचा कार्यक्रम सप्टेंबर महिन्यात होणार असुन सर्वांशी चर्चा करून तारीख ठरविण्यात येणार असल्याची माहिती आमदार कर्डिले व बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे.

# एन.एच.एम.आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांचा बेमुदत कामबंद संप नवव्या दिवशीही सुरु

### जिल्ह्यासह राज्यात आरोग्यसेवा विस्कळीत

नगर – राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत (एन.एच.एम) राज्यात कार्यरत असलेले जवळपास ३४ हजारांपेक्षा जास्त व अहिल्यानगर जिल्ह्यात १२५० पेक्षा अधिक कर्मचारी आपल्या विविध मागण्यांसाठी १९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर गेले आहेत. यामुळे राज्यातील आरोग्य सेवा विस्कळीत झाली आहे. राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा उपकेंद्र, लसीकरण मोहीम, रक्तशुद्धीकरण केंद्रांवरील सेवा, असंसर्गजन्य आजारांसदर्भातील मोहीम, जननी सुरक्षा व कुटुंब कल्याण कार्यक्रम ठप्प झाले आहेत. कायमस्वरुपी नियुक्त कर्मचारी कार्यरत असले तरी त्यांची संख्या अपुरी असल्याने त्यांच्यावर प्रचंड ताण पडत असून, रुग्णसेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना खासगी रुग्णालयांची वाट धरावी लागत असल्याने त्यांना मानसिक त्रास व आर्थिक भार सोसावा लागत आहे.

एनएचएमच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामध्ये राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांतील परिचारिका, प्रयोगशाळा तज्ज्ञ, फार्मासिस्ट, आरोग्य सहाय्यक, लिपिक, आरोग्य स्वयंसेविका यांचा समावेश आहे. या संपामुळे राज्यातील नवजात बालकांसाठी राबविण्यात येणारी लसीकरण मोहीम पूर्ण पणे ठप्प झाल्याने अनेक बालके लशींपासून वंचित राहू लागली आहेत.

मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग तपासणी, कर्करोग तपासणी अशा असंसर्गजन्य आजारांसंदर्भातील आरोग्य विभागाच्या मोहिमेवरही संपाचा परिणाम होऊ लागला आहे. फार्मासिस्ट नसल्याने रुग्णांना उपकेंद्रामध्ये औषधे मिळत नसल्याने त्यांना ती विकत घ्यावी लागत आहेत. राज्यातील जवळपास ५७ ते ५८ रक्तशुद्धीकरण केंद्रांवरील सेवाही बंद झाल्याने सर्वसामान्य रुग्णांना रक्तशुद्धीकरणासाठी खासगी रुग्णालयात जावे लागत आहे.

राज्यामध्ये कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियांवर परिणाम झाला आहे. गर्भवती महिलांच्या प्रसूतीची जबाबदारी प्रामुख्याने एनएचएमच्या परिचारिकांवर असते. मात्र संपामुळे नियमित परिचारिकांवर प्रचंड ताण आला आहे. प्राथमिक केंद्र व उपकेंद्रामध्ये होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण १५ ते २० टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. अनेक गर्भवती महिलांना खासगी रुग्णालयात जाण्यास सांगण्यात येत आहे. तसेच नवजात बालकांची परिस्थिती गंभीर असल्यास त्याला पुरविण्यात येणारी एसएनसीयू सुविधेवरही या संपाचा परिणाम झाला आहे. गंभीर बालकाला एसएनसीयू सुविधा मिळत नसल्याने त्यांना खासगी रुग्णालयात हलवावे लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना त्रासाला सोमोरे जावे लागण्याबरोबरच त्यांना आर्थिक फटकाही सहन करावा. एनएचएम अंतर्गत १० वर्ष पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे १०० टक्के समायोजन, समान काम समान वेतन लागू करावे, आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांवर दाखल झालेल्या तक्रारी रद्द कराव्यात, दरवर्षी सरसकट आठ टक्के वेतनवाढ करण्यात यावी, विमा संरक्षण लागू करावे, अशा विविध मागण्यांकडे सरकारकडून वारंवार दुर्लक्ष केल्याने ३४ हजार ५०० कर्मचाऱ्यांनी १९ ऑगस्टपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले असून, लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन सुरू राहील, अशी माहिती राज्य आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकता संघाचे अध्यक्ष विजय गायकवाड व अहिल्यानगर एकत्रीकरण समितीचे उदय देशपांडे यांनी दिली.

